म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिबद्ध
सं. क्र. ३१८३

प्रतिक्रिया

प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
प्रतिक्रिया प्रतिक्रिया
तिक्रिया प्रतिक्रिया
तिक्रिया प्रतिक्रिया
तिक्रिया प्रतिक्रिया

प्रा. अशोक नाईकवाडे


REFBK-0025133

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

निबंध राजकीय
३९८३
२५१३३
९८।१०।८६



प्रतिक्रिया

समकालीन प्रश्नांवरील लेखांचा संग्रह

लेखक : प्रा. अशोक नाईकवाडे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
मत्स्योदरी कला व वाणिज्य महाविद्यालय,
मस्तगड, जालना-४३१ २०३

REFBK-0025133

ज्ञानेश प्रकाशन, जालना-४३१ २०३

'PRATIKRIYA' – Collection of articles (Marathi language) on Contemporary issues by Ashok Naikwade, Head. Dept. of Political Science, Mastyodari College, JALNA 431 203
(Maharashtra – India)

● प्रकाशक :
ज्ञानेश प्रकाशन
द्वारा–**सौ. मंगला नाईकवाडे**
सत्य निवास, डबल जीन,
गांधी चौक, जालना ४३१ २०३

● © **सौ. मंगला नाईकवाडे**
ज्ञानेश प्रकाशन, जालना

● मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद

● किंमत : **तीस रुपये फक्त**

● आवृत्ती १००० प्रती

प्रथमावृत्ती–मार्च १९८६

● The author acknowedges his indebtedness to the Marathwada University for grant in aid received form the University towords the cost of Publication of this book.

● पूर्वप्रसिद्धी : सा. लोकपत्र, सा. लोकनायक, पाक्षिक योजना दै. राजधर्म, दै. मराठवाडा, आकाशवाणी औरंगाबाद केंद्र, दै. अजिंठा, दै. संचार.



माझे आजोबा
कै. दादाराव पवार व कै. लिंबाजीराव नाईकवाडे
माझ्या आजी
श्रीमती लक्ष्मीबाई दादाराव पवार व
कै. पार्वतीबाई लिंबाजीराव नाईकवाडे
यांना . . . . !

अशोक नाईकवाडे

मनोगत...!

'प्रतिक्रिया' हा वैचारीक आणि विविध घटना, घडामोडी-वर आधारीत लेखाचा संग्रह, पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध होताना माझ्यासारख्याला आनंद होणे स्वाभाविक आहे. कारण परंपरेने, परिस्थितीने अक्षर ओळख नसणाऱ्या कुटुंबात माझा जन्म झाला. प्रतिकुल परिस्थितीतही मी शिकावं, कांहीतरी बनावं, मोठं व्हाव अशी इच्छा माझ्या आईवडिलाची होती. स्वतः निरिक्षर असुनही मला केवळ साक्षरच नव्हे तर उच्चशिक्षित करण्याचा त्याचा प्रयत्न आजतागायत आहेच. म्हणून तर त्यानी दातकी ता. निलंगा या माझ्या गावात चांगली शाळा नाही म्हणून माझे मामाचे गाव म्हणजे नाईचाकूर ता. उमरगा येथे अगदी इयता पहिली पासून ठेवले आणि या गावीच मी खऱ्या अर्थाने शिक्षणाचे महत्व जाणू शकलो शिक्षणाचे खरे खुरे बाळकडू मला इथेच मिळाले, आजोबा आजी, मामा आदींच्या प्रेमळ सहवासात व मार्गदर्शनात मी शिकु लागलो. पुढे लातुरच्या शासकीय प्रशालेत व बसवेश्वर महाविद्यालयात त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात पदव्युत्तर शिक्षण घेण्याचा काळ म्हणजे माझ्या जीवनाला पूर्णतः कलाटणी देणारा काळ होय. विशेषतः औरंगाबाद शहरी आल्यावरच सुदैवाने मला जे गुरुजन, मित्र मिळाले. 'कमवा आणि शिका' या योजनेनुसार मी ज शिक्षण घेतले व मला जी संधी मिळाली त्यामुळेच आज हे पुस्तक निघत आहे. त्यामुळे गतकाळा-तील या सर्व घटना घडामोडी मला विसरता येणार नाहीत. या घटनाच्या श्रृंखलेमुळे तर आजचा हा क्षण आला आहे.

लातूरला महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बी. ए. ला असतांना प्रा. सोमनाथ रोडे, प्रा ज. रा. शिंदे, प्रा. कुंभार आणि

प्रा नारिंगे यांच्या सारख्या गुरुजनांमुळे मला लिखान व वक्तृत्व आदि अभ्यासोत्तर उपक्रमात भाग घण्यासाठी सतत प्रो साहन मिळत राहिले. या काळात 'राष्ट्रीय सेवा योजनेत' सहभागी झाल्यामुळे सामाजिक जाणीव निर्माण होऊ शकली. पुढे एम. ए. शिक्षणासाठी प्रा. रोडे, प्रा. डॉ. शिंदे सरांच्या सर्व प्रकारच्या सहकार्यामुळे औरंगाबादला येवू शकलो व उच्च शिक्षण घेऊ शकलो. बी. ए पर्यंतचे शिक्षणही मी 'कमवा व शिका' या प्रमाणेच घेतलेले होते. पुढें औरगाबादला 'दै. अंजिठा' या मान्यवर वृत्तपत्रात संपादकीय विभागात काम करून शिक्षण घेतले. त्यामुळे वाचन, लिखानाची संधी मिळाली. या दैनिकाचे कार्यकारी संपादक श्री. रत्नाकर पंडित आणि इतर सहकार्यांनी या काळात केलेले मार्गदर्शन व प्रोत्साहन मोलाचे ठरले.

औरंगाबाद शहरातील १९७८ ते ऑगस्ट १९८३ पर्यन्तचा काळ प्रथम एम. ए चा विद्यार्थी म्हणून व नंतर राज्यशास्त्र विभागात डॉ. प्रा. मोईन शाकीर यांच्या सारख्या प्रख्यात विचारवंताच्या मार्गदर्शनाखाली सशोधन करण्याची संधी मिळाली. 'मराठवाड्याती युवक संघटना आणि त्याचे राजकारण' या विष यावरील माझे पीएच. डी. साठी सशोधन अजून चालू आहे. या चार वर्षाच्या काळात राज्यशास्त्र विभागात सर्वच गुरुजनांकडून नेहमीच कौटुंबीक आपुलकीने मार्गदर्शन व प्रेम मिळाले. त्यामुळेच मी आज जीवनात उभा राहू शकलो आहे. विभाग प्रमुख डॉ. मोरखंडीकर, डॉ मोईन शाकीर, डॉ. सावंत, डॉ शिंदे, डॉ दर्शनकार, डॉ बोरा, डॉ. गणो, डॉ. अफाखान या सर्व गुरुजनांचे ऋण मी कधीही विसरु शकनार नाही.

औरंगाबादच्या वास्तव्यात विविध सामाजिक युवक संघटनात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काम करण्याची संधी ही मिळाली. त्यामुळे सामाजिक आर्थिक राजकीय आदी प्रश्नांची जाणीव होऊ शकली. राष्ट्र सेवादल, छात्र युवा संघर्ष वाहिनी, यंग डिबेटर्स असोशिएशन

युवापत्रकार मंच या सारख्या संघटनाच्या कार्यात आलेल्या संबंधामुळे मनाची नवी जडनघडन होऊ शकली. या संघटनातील मित्रांच्या सहवासामुळे व्यक्तीमत्त्व विकासाला आणि आपल्या जबाबदारीच्या जाणीव निर्मितीला पोषक वातावरण मिळाले.

ऑगस्ट १९८३ मध्ये जालना शहरात मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय सुरु झाले. या नव्या महाविद्यालयात राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून माझी निवड झाली. गेल्या तीन वर्षात या संस्थेचे अध्यक्ष श्री. अंकुशरावजी टोपे, प्राचार्य दादासाहेब गाभूड यांच्या प्रोत्साहनामुळे माझ्या लेखन आणि सर्व शैक्षणिक उपक्रमांना वाव मिळाला. त्यांनी दिलेली ही संधी आणि केलेले कौतुक यामुळे माझ्यावरील जबाबदारी वाढली. माझ्या सर्व प्राध्यापक सहकाऱ्यांनीही हितचिंतकांची भूमिका बजावून साहच्य केले.

प्रा. सुधीर गव्हाणे प्रा बसवराज कोरे, श्री. अर्जुन शिंदे, श्री. ज्ञानप्रकाश मोदाणी, श्री. रावसाहेब ढावळे, श्री. नामदेव चव्हाण, आकाशवाणीचे आधिकारी श्री भगवान सवाई आ. वसतराव काळे, या माझ्या मित्रांना त्यांच्या अमूल्य सहकार्याबद्दल आभार मानने त्यांना आवडणार नाही माझ्या होणाऱ्या प्रगतीत माझ्या अनेक मित्रांचा वाटा फार मोठा आहे. सर्वच मित्राचा नामोल्लेख करणे शक्य नाही पण या निमित्ताने सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत आणि विद्यार्थीप्रिय प्राचार्य डॉ जे. एम वाघमारे यानी अत्यंत कमी वेळात माझ्या या लेख संग्रहास 'पुरस्कार' देऊन मला जे प्रोत्साहन दिले व माझ्यावरील आपुलकी व्यक्त केली. त्याबद्दल मी शतशः ऋणी आहे.

या लेख संग्रहात असलेले आठ लेख हे यापूर्वी विविध दैनिक, मासिक यामध्ये सिद्ध झालेले आहेत. आकाशवाणी केन्द्र औरंगाबादहून मी केलेले भाषण आहे. या संग्रहात त्यांचे पुर्नमुद्रण करीत असल्यामुळे त्या वृत्तपत्राचा व आकाशवाणीचा मी ऋणी आहे.

आतपर्यंत महाराष्ट्रातील मान्यवर वृत्तपत्रात, मासिकात मी लिखान केलेलें आहेंत, दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. मराठवाडा, दै. नागपूर पत्रिका, दै. राजधर्म, दै. अजिंठा, दै नवा मराठा, दै. लोक विजय, दै. गोदातीर समाचार, दै आंदोलन, दैनिक रामविचार, सायंकाळ हिरवी क्षितीजे, दैनिक देशदूत, दै. यशवंत, सा. साधना, सा सोबत, सा. संजयवार्ता, पाक्षिक योजना, दै. सचार, मासिक गोडवा, लघुउद्योग, साम्ययोग, बिअँण्ड फ्रेंडशीप, लोकपत्र, युगकर्ता आर्दामध्ये मी लेखन केले आहे. तसेच विद्यार्थी असताना महाविद्यालयाच्या वार्षिकांकातही लिहिले. त्या प्रमाणेच मी स्वता: कांही अंकाचे संपादनही केले. श्री. वसंत काळे यांच्या 'लोक नायक' या अंकाचे दिवाळी अंकाचा सहसंपादक म्हणून दै. राजधर्मच्या दिवाळी अकाचा सहाय्यक संपादक म्हणून तर एम. ए. ला असताना 'जाणिवा' हे अनियत कालीक आम्ही काही मित्रांनी सुरु केलें होते. विद्यापीठातर्फे 'वृक्षगंगा पैठण' कार्यक्रमाची स्मरणीकाही संपादित केली होती. आज जालना येथून दोनवर्षांपासून 'विचार पत्रिका समर्थ' हे नियतकालीक संपादित करत आहे. अशा विविध व्यासपीठावरून मला माझे विचार मांडण्यास संधी मिळाली या पुढेही मिळत राहील. बहुजन समाजातील एका तरुणास मिळालेली ही संधी निश्चितच मोलाची नव्हे काय ?

या लेख संग्रहातील लेख लिहतांना अनेक वृत्तपत्राचे व संदर्भ ग्रंथाचे साहच झाले. हे सदर्भ पाहण्यासाठी, पूर्वीच्या लेखात सुधारणा करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा फार मोठा फायदा झाला विशेषत: माझे मित्र प्रा. सुधीर गव्हाणे यांचे सहकार्य या कामी महत्त्वाचे ठरले. या ग्रंथालयातील ग्रंथपाल व सहाय्यक, तसेच राज्यशास्त्र विभागातील प्रा डॉ. सावंतसर यानी मार्गदर्शन कले. त्याबद्दल या सर्वांचे आभार मानतो.

मराठवाडा विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाने या लेख संग्रहास भरीव अनुदान देऊन माझ्या सारख्या नव लेखकाला जे प्रोत्साहन दिलेले आहे. त्याबद्दल या विभागाचे आभार मानावे

तेवढे कमीच आहेत. अत्यंत कमी वेळात सुबक अशी प्रिंटिंग जयहिंद प्रेसमध्ये करण्यात आली. त्याबद्दल श्री बन्सवालजी आणि सर्व कामगारांचेही आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

शेवटी मी इतकेच म्हणेन की, या निमित्ताने मला एक संधी मिळाली ती म्हणजे माझ्या जडणघडणीस ज्यांचा ज्यांचा वाटा आहे, त्या सर्वांचे ऋण व आदर भाव व्यक्त करण्याची. तेव्हा मी सर्वांचे आभार मानून इथे तूर्त पूर्णविराम देतो. धन्यवाद.

० मत्स्योदरी महाविद्यालय, — **प्रा. अशोक नाईकवाडे**
मस्तगड, जुना जालना
० दि. २१ मार्च १९८६.


सदिच्छा !

आमच्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या जालना येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. अशोक नाईकवाडे यांच्या 'प्रतिक्रिया' या लेख संग्रहास सदिच्छा देतांना मला आनंद होत आहे. आजचे युग हे 'माहितीचे युग' मानले जाते. या पार्श्वभूमीवर माहिती, ज्ञान देणाऱ्या शिक्षकांनी औपचारिक पातळीवरच शिकविण्याचे कार्य करून थांबणे योग्य ठरणार नाही. लोकशिक्षणाच्या व्यापक कार्यात त्यांनी सहभागी होणेच रास्त ठरेल. या अनुषंगाने प्रा. नाईकवाडे आपल्या लेखनाद्वारे हे कार्य करीत आहेत कोणत्याही अभिव्यक्तीसाठी व्यक्ती आधी व्यक्त करण्याइतपत समर्थ होणे आवश्यक असते. लेखन अभिव्यक्तीसाठीही वाचन, चिंतन, डोळसदृष्टी अनिवार्य ठरते. प्रा. नाईकवाडे यांचेकडे हे सामर्थ्य आहे. या सामर्थ्यातूनच या 'प्रतिक्रिया' उमटल्या आहेत. त्यांचा हा विधायक लेखन छंद अधिक सखोल होवो हीच या निमित्ताने मनःपूर्वक सदिच्छा !

२० मार्च १९८६

अंकुशराव टोपे
अध्यक्ष.
मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना

शुभेच्छा !



आमच्या महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक आणि माझे सहकारी प्रा. अशोक नाईकवाडे यांच्या निवडक लेखांचा संग्रह 'प्रतिक्रिया' प्रसिद्ध होत आहे. या निमित्ताने या तरुण, होतकरू लेखकाला शुभेच्छा देण्यासाठी हे चार शब्द लिहिले आहेत

गेल्या दहा-बारा वर्षात मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला आहे, ही समाधानाची बाब असली तरी शिक्षण प्रसारासोबत आपण गुणवत्ताही टिकविली पाहिजे, वाढविली पाहिजे. त्यासाठी उच्च शिक्षण देणाऱ्या प्राध्यापकांचा दर्जा त्यांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यातून वाढविला पाहिजे. या क्षेत्रात काम करणाऱ्या प्राध्यापकांनी वाचन, लिखान, संशोधन आदी शैक्षणिक उपक्रमात सतत मग्न राहिले पाहिजे. अलीकडे ही प्रवृत्ती कमी कमी होत चाललेली दिसून येते. म्हणूनच या पार्श्वभूमीवर प्रा. नाईकवाडे यांचा प्रयत्न स्तूत्य वाटतो.

आमच्या नव्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे प्रकाशित होणारे हे पहिलेच पुस्तक आहे. त्यांच्याकडून यापुढेही ग्रंथ निर्मिती व्हावी अशी शुभेच्छा व्यक्त करतो

दादासाहेब गाभूड
प्राचार्य,

दि. १५ मार्च १९८६ मत्स्योदरी कला व वाणिज्य महाविद्यालय,
मस्तगड जालना.

पुरस्कार...

जगात घटना आणि घडामोडी या सतत घडतच असतात. आणि घडणाऱ्या घटना आणि घडामोडी जनमानसावर कमीअधिक प्रमाणात परिणाम करुन जातात. ज्या अधिक परिणामकारक असतात. त्या काळ आणि अवकाशात स्वतःच्या अस्तित्वाचा ठसा उमटवून जातात. वस्तुत. त्यांच्या अघातप्रत्याघातातून मानवी समाजात इतर अनेक घडामोडींना चालना मिळते. विविध प्रश्नांची निर्मितीही त्यातून होते विविध प्रश्नांवर त्या भाष्यही करतात. त्या प्रश्नांच्या आकलनासाठी ते भाष्य उपयोगी पडते. त्या कालखंडात आणि समाजात ज्या घटना किंवा घडामोडी घडतात, त्या कालखंडाशी व समाजाशी त्या एक प्रकारचे 'डायलेक्टिकल' संबंध निर्माण करतात आणि म्हणून त्यांच्या विषयीच्या 'प्रतिक्रिया' व्यक्त होणे स्वाभाविक असते. त्या प्रतिक्रियांची नोंद कुठे तरी होणे आवश्यक ठरते.

प्रा. अशोक नाईकवाडे हे अशा घटना-घडामोडींचे आणि त्यातून प्रस्तुत होणाऱ्या प्रश्नांचे एक डोळस अभ्यासक आहेत. 'प्रतिक्रिया' या सार्थ नावाने प्रसिद्ध होणारा त्यांचा हा लेखसंग्रह त्यांच्या अभ्यासाचा एक भाग आहे. राज्यशास्त्राचे अभ्यासक व पत्रकार म्हणून ते मराठवाड्यातील वाचकांना परिचित आहेत. विविध नियतकालिकातून व वृत्तपत्रातुन प्रासंगिक स्वरुपाचे लिखाण केलेले आहे. विद्यार्थीदशेपासून त्यांनी स्वतःला लिहिण्याची व बोलण्याची सवय लावून घेतली आहे. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत देत त्यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. चेहऱ्यावरचे हास्य न मालवू देता आणि मनातल्या आशावाद न ढळू देता प्रतिकूल परि-

स्थितीवर या तरुणाने मात केली आहे. अशोक नाईकवाडे यांना जे खंडतर आयुष्य जगावे लागले आहे. त्यांने त्यांना दोन अतिशय महत्वाच्या गोष्टी दिल्या आहेत. म्हणजे विनम्रता आणि चितनशीलता. एम्. ए. चा अभ्यास करीत असताना उपजिवीकेसाठी आधार म्हणून त्यांना औरंगाबादच्या दै. अंजिठ्यामध्ये नोकरी करावी लागली. अनेक वादविवाद आणि निबंधस्पर्धांमधून त्यांनी भाग घेतला होता. लिहिण्या बोलण्याचे प्रयत्न पत्रकारितेसाठी त्यांना उपयोगी पडले. राज्यशास्त्र हा विषय घेऊन एम्. ए. झाल्यानंतर त्यानी मराठवाडा विद्यापीठातच संशोधक छात्र म्हणूनही काही दिवस काम केले. आणि आज ते जालना येथे प्राध्यापकाचे कार्य करीत आहेत, आणि असे असले तरी त्यांनी पत्रकारितेशी जुळलेले नाते तोडले नाही. जालना येथून ते 'समर्थ' या नावाची 'विचार पत्रिका' चालवितात.

प्रा. अशोक नाईकवाडे यांनी वेळोवेळी लिहिलेल्या काही निवडक लेखांचा 'प्रतिक्रिया' हा ग्रंथ आहे. वेगवेगळ्या प्रसंगी आणि वेगवेगळ्यां नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले ते लेख आहेत. या लेखांचे स्वरुप प्रासंगिक आहे हे उघडच आहे. विविध प्रश्नांच्या व घडामोडींच्या संदर्भात विवेचक दृष्टीने व्यक्त केलेल्या त्यांच्या 'प्रतिक्रिया' या लेखांमध्ये आढळतात. हे सर्व लेख प्रासंगिक स्वरुपाचे असले तरी त्यामागे नाईकवाड्यांचे चिंतन आहे. आणि त्या चिंतनामागे त्यांची स्वतःची एक वैचारिक बैठक आहे युवकांच्या समस्या, अपंग कल्याण, ग्रामीण विकासाच्या समस्या, पंचायत राज्याची संकल्पना व कार्यात्मकता, लोकसंख्यावाढीचा भयावह प्रश्न, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य व राष्ट्रवादी प्रेरणांचा आविष्कार, नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमध्ये हुकुमशाही प्रवृत्तींचा जन्म. अशा बऱ्याच विषयांच्या संदर्भात नाईकवाडे यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया या आठ लेखातून वाचायला मिळतात, स्थानिक प्रश्नांपासून ते आंतरराष्ट्रीय प्रश्नापर्यन्तचा आवाका या लेखांमध्ये आढळतो.

एखाद्या विशिष्ट कालखंडातील विशिष्ट प्रश्नासंबंधीचे विचार हे एखाद्या लेखकांचे केवळ वैयक्तिक विचार असतील असे नव्हे ते विचार किंवा त्या प्रतिक्रिया त्या कालखंडातील इतर समकालीन विचारवताच्याही ..तिक्रिया असू शकतात लेखक हा त्याच्या समकालिनांचा प्रतिनिधी म्हणूनही कदाचित लिहित असतो. वेगवेगळ्या विषयांवर प्रा. अशोक नाईकवाडे यांनी व्यक्त केलेले विचार हे त्या अर्थाने सामाजिक जाणिवा उराशी बाळगून जगणाऱ्या समकालीन तरुणांचेही प्रातिनिधिक विचार आहेत असे म्हणणे अप्रस्तुत ठरणार नाही.

युवक म्हणजे राष्ट्राचे भवितव्य. हे भवितव्य उज्वल ठरावे असे वाटत असेल तर युवकांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास घडविणाऱ्या शिक्षणपद्धतीची नितांत गरज आहे. आपल्या शिक्षण पद्धतीला हे कार्य करता आलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. वैयक्तीक विकासाबरोबर सामाजिक विकासाचा विचार करण्याची प्रेरणा शिक्षणाने युवकांना देणे आवश्यक आहे. सामूहिक जीवन जगण्याची अभिलाषा युवकांच्या मनात शिक्षणाद्वारे निर्माण करता आली तर सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया अधिक गतिमान होऊ शकेल. अनौपचारिक शिक्षणपद्धतीचाही अवलंब हया उद्दिष्टासाठी करणे उपयुक्त ठरेल. तरुण पिढीला संवेदनशील आणि कृतिशील बनविणे हाच शिक्षणाचा प्रमुख उद्देश असला पाहिजे, असे प्रा. नाईकवाडे यांना वाटते. त्यासाठी आपल्या शिक्षण संस्थांना सातत्याने उपक्रमशील बनावे लागेल. 'विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र' किंवा 'व्यक्तिमत्त्व विकास केंद्र' हे प्रत्येक शिक्षण संस्थेत असले पाहिजे, ही त्यांची सूचना फारच उपयुक्त आहे. विकसित देशांमध्ये अशा प्रकारचे केंद्र अनिवार्य मानण्यात येते. आपल्या देशात अशा केंद्रांची आवश्यकता आहे. अनौपचारिक शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम म्हणून अशा केंद्राकडे पाहणे आवश्यक आहे.

ग्रामीण जीवनाच्या विकासासंबंधी नाईकवाडे यांनी मांडलेले विचारही मननीय स्वरुपाचे आहेत. आधुनिकता आणि लोकशाही

मूल्याची खऱ्याखुऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनात वृद्धी झाल्याशिवाय ग्रामीण विकासाला गती मिळू शकणार नाही. पंचायत राज्याचा स्वीकार त्यासाठीच तर करण्यात आला होता. पण ग्रामीण जीवनात वैचारिक आधुनिकता आणि जातीभेदातीत लोकशाही प्रवृत्ती अद्यापही रुजू शकल्या नाहीत. पूर्वीचा सरंजामशाही वर्ग लोकशाहीच्या आवरणाखाली आजही ग्रामीण जीवनातील शोषणाला कारणीभूत ठरलेला आहे. उलट लोकशाही व्यवस्थेने त्याच्या हातात शोषणाची साधणे अधिक प्रमाणात देऊन ठेवलेली आहेत. आणि म्हणूनच ग्रामीण जीवनातली कोंडी खऱ्या अर्थाने फुटलेली नाही. ती फुटल्याशिवाय ग्रामीण विकासाला गती प्राप्त होऊ शकणार नाही. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे सत्तेचे लोण खेडोपाडी पोचले. पण त्याचा फायदा आर्थिक व सामाजीकदृष्टया दूर्बल घटकांना मिळू शकला नाही. नेतृत्व या दुर्बल घटकांकडे जाऊ शकले नाही. पंचायत राज्याचा पाया म्हणजे खेडे. पण ते तर दारिद्र्यात बुडालेले दिसते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया म्हणजे शेती. पण शेती कसणाऱ्या शेतकऱ्याचे व शेतमजुरांचे हाल खाण्यासाठी कुत्रेही तयार नाही. खरे तर शेती व्यवसायालाच या देशाच्या अर्थव्यवस्थेचा व नियोजनाचा पाया मानला पाहिजे. पण याकडे प्रकर्षाने लक्ष न दिल्यामुळे शेतकरी वर्ग देशोधडीला लागल्याचे दुर्दैवी चित्र पाहण्याची पाळी आपल्यावर आलेली आहे.

समाजातील दुर्बल घटक हे अधिक दुर्बल होत असल्याचेच दुर्दैवाने आपल्या प्रत्ययाला येत आहे देशाच्या विकासाची प्रक्रिया एकीकडे चालू आहे, नाही असे नाही; पण दुसरीकडे जनसामान्यांच्या पदरी दुःख-दारिद्र्य अधिक प्रमाणात पडत आहे, ही देखील एक भीषण वस्तुस्थिती आहे. परिणामतः त्यांच्या वाटचाला आर्थिक व सामाजिक अपंगत्वाशिवाय दुसरे कांही येत असल्याचे दिसत नाही. शारीरिकदृष्टया अपंग असणाऱ्या लोकांची संख्याही या देशात कमी नाही. स्थूलमानाने ती नव्वद लाखांच्यावर आहे. अपंगाकडे आपुलकीच्या भावनेने समाज पाहू लागला तर

त्यांच्या मानसिक यातनेची तीव्रता थोडी कमी होईल. नाईकवाडे यांनी अपंगांच्या प्रश्नाकडेही वाचकांचे लक्ष वेधले आहे. म्हातारपण हे देखील एक प्रकारचे अपंगत्वच आहे, या वस्तुस्थितीकडेही त्यांनी बोट दाखविले आहे. वृद्धांच्या मानसिक पुनर्वसनाचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. खरे तर हा एक अतिशय जटील स्वरुपाचा प्रश्न आहे. आपली कुटुंबव्यवस्थाही आता बरीच विस्कटलेली आहे. वृद्धांना कुटुंबात सुरक्षित स्थान राहीले किंवा नाही, हे आज सांगता येणार नाही. पाश्चिमात्य देशात तर सुवत्ता असूनही मुळचापसून निखळलेल्या झाडासारखे जीवन जगण्याची पाळी आलेली आहे. कुटुंबाचे विघटन हे अनेक सामाजिक आणि मानसिक समस्यांना जन्म देणारी बाब ठरू शकते. समाज सुधारणेची प्रक्रिया ज्या देशात वरचेवर क्षीण होत जाते त्या देशात सामाजिक प्रश्नांची उग्रता अधिकच वाढणार हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. तेव्हा अशा प्रश्नाचा पाठपुरावा कल्याणकारी राज्याने केला पाहिजे. कल्याणकारी राज्य तर हवेच आहे. पण अधिक आवश्यकता आहे ती कल्याणकारी समाजाची. कल्याणकारी समाज निर्माण करणार तरी कोण ? तरुण पिढी, हेच या प्रश्नाचे उत्तर असू शकते. रंजल्या गांजलेल्या लोकांच्या अश्रूमध्ये देव पाहू शकणाऱ्या संतांचे डोळे लाभल्याशिवाय हे शक्य आहे का ? पण संताचे डोळे देऊ शकणारी नेत्र-पेढी कुठे आहे ? या देशात संत-महात्मे होऊन गेले तेव्हा नेत्र-पेढी नव्हत्या. आज त्या आहेत पण संत-महात्मे नाहीत. विज्ञान देखील हतबल ठरते ते अशा परिस्थतीत.

प्रा. नाईकवाडे यांच्या लेखामध्ये विचाराबरोबर एक प्रकारचे अवाहन देखील आहे. त्याचे ते 'आवाहन' प्रामुख्याने तरुणाच्यासाठी आहे. राष्ट्रीय एकात्मतेची जबाबदारी प्रामुख्याने तरुणांनी आपल्या अगावर घेतली पाहिजे. 'शेकडो अणुबॉम्बच्या शक्तीपेक्षाही राष्ट्रीय एकात्मतेची शक्ती प्रचंड असते.' असे एक विधान नाईकवाडे यांनी केले आहे. ते रास्त आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढू न शकल्यामुळे आपला देश आज धोक्याच्या वळणावर उभा

आहे. राष्ट्रीय भावना जनमानसामध्ये पूर्णतः रुजली पाहिजे. धर्म संप्रदाय, जात किंवा प्रांत आपल्या राष्ट्रीय एकात्मतेच्या आड येता कामा नये. आपल्या राष्ट्रावादाचा पाया यापैकी कणतीही गोष्ट होऊ शकत नाही. धर्मनिरपेक्ष लोकशाही मुल्यांच्या आधारावरच राष्ट्रवादाची उभारणी करणे आवश्यक आहे. दीर्घ कालीन प्रयत्नातूनच ते शक्य आहे.

राष्ट्रवादाचा आविष्कार झाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याचे लढे तीव्र होऊ शकत नाहीत, हा इतिहास आहे. नवोदित आफ्रिकन राष्ट्रांचा इतिहासही हेच सांगतो. पण राजकीय स्वातंत्र्य प्राप्त केल्यानंतर अशा राष्ट्रांना सांस्कृतिक पूनर्रचनेचे कार्य हाती घेणे आवश्यक ठरते. संकुचित अस्मिता या ना त्या रुपाने हाती घतलेल्या सांस्कृतिक पुनर्रचनेच्या कार्यातले अडथळे ठरतात. त्यामुळे त्या राष्ट्राचे स्वातंत्र्यही धोक्यात यऊ शकते. मिळालेले स्वातंत्र्य हे त्या देशातील सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी असते; आणि म्हणून त्याचा फायदा सर्वांच्याच पदरात पडणे आवश्यक असते. धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे संवर्धन हाच एकमेव पर्याय मानल्याशिवाय उज्वल भवितव्याची भाषा अर्थपूर्ण ठरू शकत नाही. ते राष्ट्र मग झिम्बाब्वे असो की युगांडा. तिसऱ्या जगातील राष्ट्रासमोर ही समस्या सातत्याने उभी आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेला लाथाडून तिथे हुकुमशाही निर्माण होण्याचे धोके आहेत. काही देशात हुकुमशाही निर्माण झालेलीच आहे. परकीयांनी लादलेल्या गुलामगिरीपेक्षा ही गुलामगिरी चांगली असू शकत नाही. इदिअमान सारखे नरराक्षस हे आपल्याच देशाच्या स्वातंत्र्यावर बलात्कार करीत असतात.

प्रा. अशोक नाईकवाडे यांनी आणखी एका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. आणि तो प्रश्न आहे लोकसंख्याविस्फोटाचा. लोकसंखेचा प्रश्न हा प्रश्नांचा प्रश्न आहे असे मला वाटते. आपल्या देशातील प्रत्येक प्रश्नांच्या बुडाशी लोकसंख्यावाढीचा प्रश्न आहेच, तो प्रश्न सोडवता आला तर बाकी सर्व

प्रश्न त्या त्या प्रमाणात सुकर होतील, लोकसंख्यावाढ बरोबर नुसत्या दारिद्र्याचाच प्रश्न वाढेल असे नव्हे. इतर सर्वच प्रश्नांची जटिलता त्या त्या प्रमाणात वाढेल. हे सांगण्याची आवश्यकता नाही. या विसाव्या शतकाच्या शेवटी भारताची लोकसंख्या १०५ कोटीच्या घरात जाईल असा जागतिक बँकेचा अदाज आहे आपली लोकसंख्या भूमितीय पद्धतीने वाढते आहे. आणि त्यामुळे आपल्या इतर अनेक प्रश्नांचो जटिलताही भूमितीय पद्धतीनेच वाढते आहे. हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जिला आपण दारिद्र्यरेषा म्हणता ती वर सरकणार नाही. तो आणखीण खाली सरकेल. आरोग्याचा प्रश्न त्यामुळे सुटणार नाही. निरक्षरतेचा प्रश्न सुटणे अवघड होऊन बसेल. १९९० पर्यंत सार्वत्रिक साक्षरतेचे ध्यय गाठण्याचा सकल्प आपण सोडला आहे. पण ते शक्य नाही याचा जाणीव आजच झालेली आहे. दारिद्र्य आणि अज्ञानात बुडालेल्या लोकांना राष्ट्रवादाचे धडे देणे निरर्थक ठरत असते. अर्ध्या भाकरीच्या बदल्यात स्वातंत्र्याचा पूर्ण चद्र विकल्याची उदाहरणे जगाच्या इतिहासात सापडू शकतात. व्यक्तिगत स्वातंत्र्य आपल्या देशात रोजच विकले जाते. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न जटिल होण्याचे हे देखील एक कारण आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नाची जटिलता लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाशी निगडित आहे. विविध आघाडयांवर आपण करित असलेल्या विकासाच्या प्रयत्नावर पाणी टाकण्याचे काम लोकसंख्या वाढीचा हा प्रश्न करीत आहे. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम युद्धपातळीवर हाताळल्याशिवाय या प्रश्नामुळे निर्माण होणारो जटिलता आपण टाळू शकणार नाही. या प्रश्नाची चर्चा नाईकवाडे यांनी चांगल्या प्रकारे केली आहे.

एकविसाव्या शतकात पदार्पण करण्यासाठी आपण सज्ज आहोत. एकविसाव्या शतकातल्या जीवनाचे रोमँटिक चित्र रंगविण्याचा आमचा प्रयत्न आहे. एकविसाव्या शतकातल्या वाटचालीसाठी मागच्या शतकांनी दिलेली सगळीच शिदोरी उपयोगी पडणार नाही. अनेक प्रश्न आपल्याला निकालात काढणे भाग आहे.

दारिद्र्य, बेकारी आणि निरक्षरतेचे प्रश्न तरी एकविसाव्या शतकाच्या उवरठ्यावर पाय ठेवण्यापूर्वी सोडविण्याचा निर्धार केला पाहिजे. विसाव्या शतकाच्या अंतापर्यन्त आपल्या देशाला जुनी कात टाकता आली पाहिजे. एकविसाव्या शतकातल्या आपल्या मार्गावर इथून तिथून कल्पवृक्षांची दुतर्फी गार सावली आढळेल, अशी खुळी कल्पना उराशी वाळगता येणार नाही. तरुण पिढीला उद्याच्या वास्तवाला सामोरे जावे लागणार आहे.

प्रा. नाईकवाडे यांनी समकालीन प्रश्नांची चांगली जाणीव आहे. त्या जाणोवेतून त्यांनी हे लेख लिहले आहेत. या तरुण मित्राचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्याच्या पुढच्या वैचारिक प्रवासात माझ्या शुभेच्छा त्याच्या बरोबर आहेतच.

प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे
राजर्षि शाहू महाविद्यालय,
लातूर-४१३ ५१२

दि. २० मार्च १९८६

अनुक्रमणिका

१) युवकांचा व्यक्तित्व विकास : संघटना आणि घटक १

२) ग्रामीण स्वराज्य संस्था आणि शोषण ९

३) पंचायत राज आणि ग्रामीण विकास १५


४) अपंग कल्याण एक सामाजिक जबाबदारी २८

५) राष्ट्रीय एकात्मता ३४

६) लेकुरे उदंड जाहली : लोकसंख्या वाढीचा प्रश्न ४२

७) आफ्रिकेतील देश युगांडा–इदि अमिनचा अंत ५४

८) आफ्रिकेतील देश–झिबांबे–स्वातंत्र्य संग्राम ६१



युवकांचा व्यक्तित्त्व विकास : संकल्पना आणि घटक

आजकाल जे शिक्षण शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठातून दिले जाते त्याविषयी सार्वत्रिक असंतोष आहे. शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट 'व्यक्तिमत्त्वाचा विकास' असे मानले तर या औपचारिक शिक्षणाने ते साध्य होत नाही हे बहु अंशी खरे आहे. बरे हे शिक्षण पोटार्थी उपजीविकेचे साधन निर्माण करून देणारे मानावे तर त्यातून नौकरी मिळण्यासाठीही पूर्णतः उपयुक्त ठरत नाही, तशी शंभर टक्के हमी यातून मिळत नाही. तांत्रिक दृष्टचा असे अनौपचारिक शिक्षण प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या मिळते. त्यातूनच खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, त्याची जडणघडण होते. देश, समाज, तसेच हक्क आणि कर्तव्याचे धडे मिळत राहतात आणि असे सामूहिक जीवनाचे धडे औपचारिक शिक्षणाच्या भिंती तोडूनच मिळते. म्हणूनच खऱ्याखुऱ्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनौपचारिक शिक्षण अथवा यातूनच मुक्त विद्यापीठाची कल्पना पुढे येते आणि अशा शिक्षणाची जी अनेक माध्यम आहेत त्यात युवकांच्या भिन्न भिन्न संघटना, संस्था होत. याशिवाय क्रमिक अभ्यासक्रमाबाहेर जी शिबिरं, मेळावे, चर्चासत्र, सभा, सहली, बौद्धिक वर्ग, खेळ, विविध कलागुणांच्या स्पर्धा, प्रदर्शन इत्यादी उपक्रम कुटुंब संस्थेपासूनच ते शासकीय यंत्रणेतील संस्थे अंतर्गत होणाऱ्या घडामोडी यातूनच युवकांचे व्यक्तिमत्व घडत असते, त्याच्यात नेतृत्वाची जाण निर्माण होते. म्हणूनच त्यांनी या सर्व उपक्रमाकडे सूक्ष्म निरीक्षण केले पाहिजे आणि त्यात सहभागी झाले पाहिजे. व्यक्तित्व विकास हे दुसरे तिसरे काही नसून व्यक्तीच्या अंगी असलेल्या सर्व सुप्त गुणांचा विकास करणे होय.

यासाठीच हे अनौपचारिक शिक्षणाचे उपक्रम मोठ्या प्रमाणात चालवले पाहिजेत.

समर्थ व्यक्तिमत्व विकासासाठी त्यांची सुरूवात, त्याची जडणघडण युवा अवस्थेतच होत असते, कोणत्याही नव्या कल्पना नवे विचार आत्मसात करण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि त्याला भावेष्यात कृतीची जोड मिळण्यासाठी हे कोवळे वय, संवेदनक्षम मन अनुकूल ठरते म्हणूनच या युवा मनाचा उपयोग, त्याची चांगली जडणघडण यावेळीच केली पाहिजें अन्यथा हा तरुण युवक, प्रस्थापित समाज रचनेचा भाग बनण्यास कार्हं च वेळ लागणार नाही. प्रवाहासोबत वाहात जाणे अवघड नसतेच, ते सहजच वहात जाते असे होऊ नये म्हणून त्याच्यात नव्या अनौपचारीक शिक्षणाची शिकवण दिली पाहिजें आणि असे शिक्षण शिबिर, चर्चासत्र आणि क्रमिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर उपक्रमातूनच मिळते म्हणून यात युवकांनी भाग घेतला पाहिजे. यामुळे हे तरुण बहुश्रुत होतील. त्यांच्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा विकास होईल. किमान पक्षा त्यांना दिशा सापडल असे संमिश्र उद्देश साध्य होतील.

शरीर, मन आणि बुद्धी ही निसर्गाने प्रत्येकाला दिलेली आहे. परंतु त्याचा वापर सर्वजण सारख्याच प्रमाणात करत असतात असे नाही. या तिन्हीचा वापर जो अधिकाधिक करेल त्याचे व्यक्तिमत्व उंचावेल, विकसित होईल. मन आणि बुद्धीला वैचारिक खाद्य देण्यासाठी तर अशी शिबिर आणि चर्चासत्र आवश्यक ठरतात. तद्वतच वाणी विचार आणि वर्तन याचीही सुसंगती, सुसंवाद व्यक्तित्व विकासासाठी आवश्यक ठरतो.

तेव्हा असे अनौपचारिक शिक्षण देण्याची प्रथा आपल्या देशात नवीन नाही. ती फार जुनी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तर अशी संस्कार शिबिरे सातत्याने होत होती, तरुण पिढीवर संस्कार घडवून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात खेंचण्याचे शिबिराचे उद्दिष्ट त्या

काळी होत असल्याने शिबिराच्या उपयुक्ततेसंबंधी आजच्यासारखी शंका क्वचितच होत असेल. खरे तर आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय जीवनात पोकळी निर्माण झाली आहे, विधायक प्रवृत्तीला फाटा मिळाला सत्तेच्या राजकारणामुळें स्वार्थाला सीमा उरली नाही. प्रामाणिक कार्यकर्ता निर्मितीची प्रक्रिया बंद पडल्यासारखी वाटते. घरातून आणि शिक्षण संस्थातून मिळणारे सस्कार अपुरे पडू लागले, संस्कारक्षम साहित्याच्या वाचनाची गोडीही इथें निर्माण होऊ शकली नाही. पर्यायाने विधायक कार्यक्रम आणि प्रभावी नेतृत्व समोर नसल्यामुळे दिशाहीन झालेला तरुण विध्वंसाकडे वळतो आहे अथवा क्रियाहीन बनतो आहे.

'मास एज्युकेशन' प्रयोगात आपल्याला शिक्षणाचा दर्जा राखता आला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याची कमतरता कशी भरून काढायची? हा महत्वाचा गंभीर प्रश्न आहे कारण ६० टक्के विद्यार्थी अशा घरातून येतात की त्यांना संस्कार देणारे वातावरण तेथे लाभण्याची सुतराम शक्यता नाही. शाळा आणि महाविद्यालयातून संस्कार घडावेत तर प्रचलित परीक्षा पद्धती, शिक्षकांचा स्वत चा दर्जा, त्याचा विद्यार्थ्यांशी अपूरा येणारा संपर्क अपुरी संशोधन, असे अनेक अडथळे आहेत शालेय जीवनाचा ऊंबरठा ओलांडतांनाः दिशाहीन झालेले किशोर वयातील विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतात. अशा तरुणांना दिशादर्शन करणारी, निदान नवख्या जगाचे दर्शन घडविणारी स्थळे, व्यासपीठ अवश्य असावीत असे वाटते, आणि हेच महत्वाचे कार्य युवक संघटना कडून घेण्यात येणाऱ्या शिबिरातून उपक्रमातुन मिळावे ही अपेक्षा केल्यास चुकीचे ठरणार नाही. त्यासाठीच अशा अनेक संस्था, संघटनाचे जाळे समाजात असणे अगत्याचे आहे. आज आपल्या समाजात, देशात आपले मुख्य तीन शत्रू आहेत असे मला वाटते. अज्ञान, अन्याय आणि अभाव या तिन्ही शत्रूशी लढण्याची आवड युवकांत निर्माण केली पाहिजे मात्र लढावे कसे याचे नेमके ज्ञान आणि लढण्याची नेमकी दिशा त्यांना माहित नसते. जीवनाचे प्रयोजन शोधण्यात

गर्क असलेल्या युवकाना कुणीतरी त्या प्रयोजनाची ओळख करून द्यावी लागते, हे कार्यच युवक संघटना, शिक्षण संस्था, समाज सुधारणा केंद्र यातून व्हावी त्यासाठीच बौद्धीक, शिबीर, चर्चासत्र आवश्यक ठरतात, चाकोरीबद्ध पद्धतीपेक्षा मोकळी चर्चा, संवाद आवश्यक असतो; तोच व्यक्तीत्व विकासाचा एक महत्वाचा भाग होतो.

सभोवतालच्या संवेदनाहीन समाजात जगणाऱ्या युवक मनाला केवळ संवेदनाक्षम असून चालत नाही तर अन्याय आणि अत्याचार पाहून हळहळणारे, दुःख व्यक्त करणारे मन, संवेदनाक्षम असेल, पण कृतिशील असेलच असे नाही. संवेदनक्षम मनाचा ओढा कृतिशीलतेकडे वळवावा लागतो. अन्यायाचा प्रतिकार करण्याची तीव्र इच्छा मनात तात्काळ उभी रहायला हवी. त्या इच्छेप्रमाणे कार्यही घडायला हवे हे कार्य घडवतांनाही त्याची दिशा योग्य व्हावी समाजातील जीवघेणे व गुंतागुंतीचे प्रश्न केवळ समजून घेऊन चालत नाही तर त्यावर योग्य उत्तर शोधून ते प्रश्न सोडवावे लागतात. युवकामध्ये ही प्रवृत्ती निर्माण व्हावी त्याच्या साहसाला सृजनाची जोड मिळावी, त्यांना एक दृष्टी प्राप्त व्हावी म्हणून युवकांना एकत्र आणून त्याच्यात विचार मंथन करण्याची गरज आवश्यक ठरते. मग ते युवक भिन्न विचार सरणीने भारावलेले असो की, भिन्न समाज वर्गातील, वयोगटातील असोत, नव्हे तर अशी भिन्नता असणे एका अर्थाने आवश्यकही असते कारण त्यातून वेगवेगळे विचार एकत्रित ऐकावयास मिळतील आणि सर्वांच्या चिंतनातून एक सामूहिक विचार, एक सामूहिक योजना कार्यान्वित करता येऊ शकेल; केवळ विचार करून कार्यक्रम आखून जमणार नाही तर त्या पूर्ण केल्या पाहिजेत. 'भान ठेवून योजना आखा आणि बभान होऊन त्या पूर्ण करा' असे बाबा आमटेंनी म्हटलेले आहे ते यासाठीच. आणि अशा योजना सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या युवकाकडून पूर्ण होऊ शकतात. मग सामाजिक बांधिलकी म्हणजे काय ? तेव्हा सामाजिक बांधिलकी म्हणजे एखाद्या

सामाजातील व्यक्तीची (अ) आपण त्या समाजाचे अविभाज्य घटक आहेत अशी भावना असणे, (ब) त्या समाजातील परिस्थितीची जाण असणे (क) त्या समाजातील समस्या निवारण वा नवसमाज निर्मितीसाठी आपलाही सहभाग आवश्यक आहे. असा दृढ विश्वास असणे (ड) व त्या दृष्टीने प्रत्यक्षात प्रयत्न करणे. जाणीवपूर्वक, सहेतुक भाग घेणे. अशा स्वातंत्र्याच्या बांधिलकीचा विचार मनात रुजला पाहिजे, परंतु दुर्दैवाने युवकातील सामाजिक बांधिलकीचा अभाव हा समाजातील सर्व क्षेत्रातील, सर्व क्षेत्रातील, सर्व मोठ्या व्यक्तीच्या सामाजिक बांधिलकीच्या अभावाचे प्रतिबिंब आहे. वडील, प्रौढपिढीचा विचार आचारातील जमिन–आस्मानाचे अंतर पाहून तरुण मन काय करील हे उघड आहे. असलेली परिस्थिती कायम ठेवण्यास्तव, 'जैसे थे' वादी वृत्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे परिवर्तनकारी शक्ती कमीच पडते आहे. अज्ञान, संस्काराचा अभाव आणि हितसंबंधाची जपणूक हे परिवतनातील अडथळे आहेत, तेव्हा हे अडथळें नाहीसे करून सामाजिक बांधिलकीचा विचार कृतीने स्वीकारणे म्हणजेच व्यक्तीमत्वाचा विचार करणे होय. माझ्या दृष्टीने हीच व्यक्तिमत्वाची सकल्पना आणि हेच तिचे घटक होत.

युवकाच्या व्यक्तीमत्व जडणघडणातील क्रमिक अभ्यासक्रमासोबत अनौपचारिक शिक्षण, अवांतर, सामान्य ज्ञान आणि त्याचा सामाजिक कार्यालयातील सहभाग आवश्यक आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. परंतु युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवर युवकांना योग्य मार्गदर्शन करणारी 'विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र' अथवा 'व्यक्तित्व विकास केंद्र' असणे आवश्यक आहे, आमच्याकडे शासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात काही खाजगी संस्थाकडून असे कार्यही होत असेल परंतु ते फारच नगण्य आहे. विशेषतः मराठवाड्यात अशा केंद्रांची अतिशय आवश्यकता आहे माझ्या माहितीप्रमाणे असे केंद्र आमच्याकडें नाहीत. पुणे, मुंबईसारख्या शहरांत काही केंद्रे

चालवली जातात आणि त्याचा तेथील युवकांना फार मोठा फायदा होतो हे मी पाहिलेले आहे. अशा केंद्रांनी तीन प्रकारची कामे करावीत. १) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत अडचणी वैयक्तिक पातळीवर मुलाखतीद्वारे सोडविणे. २) शैक्षणिक व इतर व्यावहारिक अडचणी वैयक्तिक पातळीवर सोडविण्यासाठी प्राध्यापक, पालक, समाजकार्यकर्ते व समाजातील इतर सुविधा यांच्या गरजनुसार एकसूत्रीकरण (को-ऑर्डिनेशन) करणे. ३) युवकांच्या विचारांना चालना देण्याविषयी, युवकांमध्ये त्याच्या स्वतःच्या समस्याबाबत वैचारिक देवाण घेवाण होण्यासाठी चर्चासत्रे परिसंवाद, शिबीर आदिचे आयोजन करणे, यामुळे व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळेल युवकांना सामूहिक जीवनाची, सामाजिक बांधिलकीच्या कार्याची, मुल्याची आवड निर्माण होईल, अशा युवक – विद्यार्थी मार्गदर्शन केंद्राद्वारे व्यक्तिगत विकास होईल. कारण यातून युवकाच्या सर्वसुप्त कलागुणांना चालना मिळेल, प्रोत्साहन मिळेल. वक्तृत्व, लेखन, कला, खेळ आदि क्षेत्राचा विकास होईल कारण या प्रत्येक क्षेत्राचे व्यक्तीच्या व्यक्तित्व विकासासाठी, एक अपरिहार्य स्थान आहे. गरज आहे. वक्तृत्व ही एक बाब जरी घेतली तर आपणास असे दिसून येईल की, लोकशाही शासन पद्धती आणि जीवननिष्ठा आपण अंगीकारल्यामुळें शिक्षक, वकील, संसदपटू यांना जसे वक्तृत्वाचे महत्त्व आहे हे सहज लक्षात येते पण मेडिकल असोसिएशनला आपला मुद्दा पटवून देणारा डॉक्टर, एखाद्या सरकारी योजनेचा तपशील समजावून सांगणारा सरकारी अधिकारी, आणि सहकारी संस्थेचा पदाधिकारी असलेला शेतकरी अथवा कारखान्यातील कामगार, आपला माल विकणारा विक्रेता यांनाही वक्तृत्वाची तेवढीच आवश्यकता आहे, हे आपल्या चटकन ध्यानात येत नाही. आज वक्तृत्व कलेची जोपासना करण्यासाठी डझनवारी वक्तृत्व स्पर्धा चालतात पण बोलायचंच कसे ? हे कोणीच शिकवीत नाही, व सांगत नाही. स्पर्धेचे परिपत्रक कॉलेजकडे येते, नोटीस लागते (काही ठिकाणी नोटीसही विद्यार्थ्यांना दाखविली जात नाही, चाचणीही होत नाही) चाचणी होते आणि प्रतिनिधी पाठविले जातात.

पण या प्रक्रियेस या ना त्या कारणाने आपण बोलू शकू असे ज्यांना वाटते अशा हजारी एक-दोन विद्यार्थ्यांना संधी मिळते. यासाठी वक्तृत्वाचे पद्धतशीर प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. वादविवाद, परिसंवाद, भाषण, उत्स्फूर्त भाषण, कथाकथन आदी यांचे आवश्यक ते तंत्र शिकविले जाणे आवश्यक आहे. या प्रत्येक प्रकारच्या तंत्रातील सूक्ष्म भेद समजणे आवश्यक आहे. व्याख्याने प्रात्यक्षिके, वक्तृत्वावरील ग्रंथ आणून, त्याच्या साहचर्याने व्यायाचं स्वाध्याय आणि वैयक्तीक वाचण्याचा सर्वांचा अंतर्भाव असलेली एक तपशिलवार योजना तयार करुन ती राबविली पाहिजे; असे प्रयोग व्यक्तित्व विकासाच्या सर्व क्षेत्रात केले जावेत. असे कार्य युवक विकास अथवा व्यक्तित्व विकास केंद्रातून व्हावीत. अशी केंद्रे प्रत्येक महाविद्यालयाने सातत्याने चालविली पाहिजेत. अशा केंद्राद्वारे, प्रयोगाद्वारे, युवक नव्याने विचार करण्यास प्रवृत्त होतील. अशा विचार प्रक्रियेतूनच ते संकल्प करतील. या संकल्पातून त्यांना जबाबदारीची जाणीव होईल. आणि या जबाबदारीच्या जाणिवेतूनच व्यक्तिमत्व उभारले जाईल. युवकांना व्यक्तित्व विकास होताना ती त्यांच्या पुरताच मर्यादित राहू नये. ही बाब त्यांनी लक्षात घेतली पाहिजे, या संबंधातच त्यांनी समाजसेवा केली पाहिजे. खरे तर प्रमाणिक समाजसेवेतच व्यक्तित्व उजळून निघते. मग ती सेवा कोणत्याही क्षेत्रातील असो. अशा समाजसेवेतून उच्च जीवनाची केवळ अभिलाषा नव्हे तर त्यासाठी काहीही करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे अन्यथा सेवा घ्यायला सोकावलेले लोक निर्माण होतील. आणि तरुणांचा समाजसेवेवरील विश्वास उडून जाईल. म्हणून समाजसेवा करताना तीन पथ्य पाळली पाहिजेत. १) एक व्यक्ती अथवा एका कुटुंबाला त्याचा लाभ मिळू नये, तो सामूहिक लाभ असावा २) समाज सेवेतून समृद्धी, संवेदनशीलता, आत्मनिर्भरता राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक एक्य वाढावे. ही सेवा समाजासाठी काम नव्हे. ती समाजासोबत काम अशी राहील. या प्रत्यक्ष कृतीतूनच नेतृत्व सहज विकसित होईल. या संदर्भात एक थोर विचारवंतांनी म्हटले आहे की, ' आय रीड, आय हिअर अँड आय फर-

गेट (मी वाचतो, मी ऐकतो व मी विसरतो) आय सी अँड आय रिमेंबर (मी पाहतो व ध्यानी राहते) अँड आय डू अँड अंडरस्टँड (आणि मी करतो तेव्हा आकलन होते) तेव्हा प्रत्यक्ष कृतीला किती महत्व आहे हे लक्षात येते आणि कृतीशीलता खऱ्या-खुऱ्या व्यक्तित्व विकासाची गुरुकिल्ली आहे.

तेव्हा शरीर सुदृढ, बुद्धीस तेज, हात कुशल, हृदय कोमल, असणारे आणि वाणी व वर्तनात काहीही अंतर न ठेवणारे तरुण, युवक हेच राष्ट्राचे खरेखुरे आधारस्तंभ असतात. हीच खरी राष्ट्रीय संपत्ती. राष्ट्रीय शक्ती असते. अशी शक्ती, अशी संघो युवकात निर्माण होण्यासाठी युवकाचे व्यक्तित्व सर्वांगांनी विकसित झाले पाहिजे. तरच भविष्याबद्दल आशा बाळगता येईल आणि आपल्या समाजापुढील देशापुढील, अनेक जटिल प्रश्न सुटू शकतील.

ग्रामीण स्वराज्य संस्था आणि शोषण

मानवाने जेव्हा समूहाने राहण्यास सुरुवात केली तेव्हापासूनच सार्वजनिक प्रशासनाचा प्रश्न निर्माण झाला आणि मग मानवाच्या विकासाच्या प्रक्रियेबरोबरच या प्रशासकीय यंत्रणेस सतत बदल होत राहिले. आजही ही प्रक्रिया थांबलेली नाही आणि पुढेही थांबणारी नाही कारण ती एक सातत्याने चालू राहणारी यंत्रणा आहे. मानव यात आपल्या गरजेप्रमाणे बदल करत असतो आणि आपल्याला अनुकूल अशी परिस्थिती त्याद्वारे निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत राहतो. यात व्यक्तीच्या अथवा गटाच्या महत्वाकांक्षा, हितसंबंध यांचा परिणाम या सार्वजनिक संस्थाच्या संपूर्ण यंत्रणेवर होत असतो असे परिमाण बरे वाईट दोन्हीही असू शकतात. याच ग्रामीण स्वराज्य संस्था 'ग्रामपंचायत' या नावाने सर्व परिचित आहेत.

आपल्या देशात अति प्राचीन काळापासून खेड्यांचा कारभार येथील अशा ग्रामपंचायत अथवा ग्रामसभा 'पंचपरमेश्वरा' द्वारे चालत असल्याचे पुरावे इतिहासात आहेत. त्यामुळे भारतीयांना आजची स्थानिक स्वराज्याची कल्पना नवीन नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातही संपूर्ण भारतात खेड्याचा, शहराचा कारभार चांगल्या प्रकारे तेथील स्थानिक लोकाकडून चालत असल्याचे सर्वश्रुत आहेच. पण पूर्वी खेड्यांचा कारभार गावातील विशिष्ट, धर्मातील वरिष्ठ लोकाकडेच राहत असे. त्यामुळे सर्वसामान्य, अशिक्षित, खालच्या समजल्या जाणाऱ्या जाती धर्मातील व्यक्तीना भाग घेता येत नसे. पर्यायाने शोषणाची प्रक्रिया चालूच होती. पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशभर स्वराज्याची तोरणे बांधली गेली, स्वातंत्र्याची

तुतारी वाजली, समतेचा आवाज बूलंद झाला. नव्या आशा आकांक्षा निर्माण झाल्या. सामान्य माणूस मुक्त झाला. त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली समान मताचा तो अधिकारी झाला हे सर्व देशाच्या सर्वोच्च राज्यघटनेत नोंदविले गेले. पहाता पहाता लोकसभेच्या सात मध्यावधी निवडणूकाही सपल्या. ३८ वर्षांचा काळ लोटला. पण ग्रामीण स्वराज्य संस्था आहे त्याच ठिकाणी राहिल्या. कांही मामूली, दिखावू बदल झाले मूलभूत बदल होऊच शकला नाही. असे का व्हावे? हे सामान्य ग्रामीण नागरिकाला अजूनही न सुटलेले कोडे आहे

सर्वांगीण ग्रामीण विकास जनतेच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणे त्यांच्याच सहकार्याने आणि लोकशाही मार्गाने घडवून आणण्यासाठीच 'पचायत राज' संस्थांची स्थापना करण्यात आली. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली. २ ऑक्टोबर १९५९ पासून म्हणजे गेल्या पंचेचाळीस वर्षापासून अशी लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची अभिनव व्यवस्था निर्माण करण्यात आली. महाराष्ट्रात ही पद्धती १ मे १९६२ पासून सुरू झाली. भारतातील ग्रामीण जीवनाचे लोकशाहीकरण आणि आधुनिकीकरण ही दोन ध्येये साध्य करण्यासाठीच या स्थानिक स्वराज्य संस्थांचा जन्म झाला आज भारतातील ९९ टक्के खेडी आणि त्यातील ९८ टक्के ग्रामीण लोकसंख्या या ग्रामपंचायतीच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. १९७५ मधील माहितीनुसार देशात ३४९४ पचायत समित्या आणि ३५३ जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या होत्या. महाराष्ट्रात २९ जिल्हा परिषदा आणि २०० पेक्षा जास्त पंचायत समित्या आहेत. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीची सख्या २३९५९ आहे. वरील आकडेवारीवरून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सहज लक्षात येईल. या विकेंद्रीकरणामुळ ग्रामीण जीवनाचे व ग्रामीण माणसाच्या वर्तणुकीचे लोकशाहीकरण करण्याचे, ग्रामीण भागाचे आधुनिकीकरण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास

साधण्याचे मुख्य ध्येय या संस्थांचे आहे. सत्तेचे आणि अधिकाराचे विकेंद्रीकरण यामुळे व्हावे ही धारणा आहे. लोकशाही जीवन-मूल्याचे शिक्षण देण्यासाठी स्वतःचा विकास स्वत.च्या प्रयत्नाने करता यावा. त्यासाठी त्यांना स्वशासनात भाग घेण्याची संधी उपलब्ध करण्यासाठी ही नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली. पण या संस्थेच्या मूल्यमापनानंतर निराशाच अधिक पदरी पडते. या क्षेत्रात झालेली प्रगती अत्यंत मंदगतीने आणि अनेक अयोग्य मार्गाने झाली असे दिसते हे एक प्रकारचे शोषणच होय.

पंचायती व्यवस्थेमुळे नवे नेतृत्व निर्माण व्हावे विकासाला वेग यावा, सर्व प्रकारच्या शोषणाला पायबद बसावा म्हणून ही व्यवस्था निर्माण केली पण वास्तवात असे दिसत नाही कै. काका-साहेब गाडगीळ म्हणतात की, 'स्वराज्य म्हणजे चुका करण्याचा अधिकार व ती सुधारण्याची जबाबदारी होय' पण दुर्दैवाने ही जबाबदारी आम्ही ओळखतच नाही. जबाबदारीची जाणीव वाढविली पाहिजे. कायदा कितीही चांगला असला तरी त्याचा अंमल करणारे पक्ष आणि न्यायी नसले तर अनर्थ होतो' असे सांगुन ते पुढे म्हणतात की, 'नवे नेतृत्व हवे आहे पण नवे नेतृत्व म्हणजे टोपी बदलून चावडीत शिजलेले नसावे अज्ञानापासून धोका नाही, धोका आहे चारित्र्यहीनतेपासून. शून्यतेपासून' त्यांचे हे विचार किती साध्य आहेत; पण लक्षात कोण घेतो. हीच खरी शोकांतिका आहे.

ग्रामीण जनतेचे शोषण अनेकाकडून आणि अनेक मार्गांनी सतत चालूच असते. ते केव्हा, कसे कोणाकडून थांबेल तो सुदिन. ग्रामीण स्वराज्य संस्थांनी जनतेची सेवा करावी हा मूलभूत कर्तव्याचा भाग आहे पण या संस्थातही पूर्वीचेच जमिनदार, सावकार, पाटील, कुलकर्णी, पटवारी, इनामदार, देशमुख, देशपांडे आदी तेच ते नव्या नावाने, नव्या अधिकाराने शिरलेले आहेत. त्याची पकड कायम आहे. जात, धर्म, रक्त संबंध आणि दंडेलशाही यामुळे मतदान न्याय्य होत नाही. तेव्हा ग्रामपंचायतीच्या नव्या अधिकार-

पदावर सरपंच तोच येतो. सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदावर त्याचेच हितसंबंधी निवडले जातात. पोलिस पाटील त्याचेच; यामुळे मूळ कोंडी पुटलेली नाही. या क्षेत्रात निर्वाचित अथवा राजकीय नोकरशाहीचा नवा वर्गच निर्माण झालेला आहे तो सत्ता, प्रतिष्ठा आणि पैसा यावर डोळा ठेवून आहे. सामान्याचा आवाज गावाबाहेर पोहचूच शकत नाही आणि जरी पोहचला तरी तालुक्यात जिल्ह्यात त्यांचेच हितसंबंधी असतात. आणि मग भ्रष्टाचार वशिलेबाजीचे असुरीपर्व सुरू होते. ही नित्याची बाब आहे. यामुळे आमचा ग्रामीण सामान्य माणसास काहीही करता येत नसल्यामुळे स्थितप्रज्ञ बनला आहे. पण हे बरोबर नाही. त्याला जागे केले पाहिजे त्यात चेतना निर्माण केली पाहिजे.

आज ग्रामीण भागात सावकार, व्यापारी, जमीन मालक, स्वार्थी राजकारणी आणि सरकारी नोकर यांच्याकडून खेडूत, अज्ञानी आणि गरीब लोकांची पिळवणूक होत आहे. ही पिळवणूक आर्थिक सामाजिक आदी प्रकारची असू शकते. ग्रामस्वराज्यातील हा अडथळा आहे खेड्यातील बाहेरून आलेला सरकारी नोकरवर्गही खेड्यातील गरीब मजूर, अल्पभूधारक, गरजू माणसाला भल्या मोठ्या व्याजाने पैसे देऊन त्याची लुबाडणूक करत आहेत. विशिष्ट कागदपत्रांसाठी सामान्य माणसाकडून जादा पैसेही उकळले जातात. काही धमक्याही दिल्या जातात सहकारी संस्थांच्या पतपेढ्या आणि आता बँका यातून या सामान्य लोकांना मोठ्या व्याजदरावर पैसे देऊन त्याची ऐपत नसताना त्याची परिस्थिती न लक्षात घेता वसुली करण्याचे गैरमार्गही अवलंबिले जाऊन त्याची एक प्रकारे मानहानी, पिळवणूक करण्यात येते. त्याने घेतलेला पैसा त्याच कार्यासाठी वापरला किंवा नाही हे पाहिले जात नाही. हा गरीब घेतलेले कर्ज अडचणीमुळे त्याच कामासाठी, उत्पादक कामासाठी वापरत नाही. मग काय थकबाकी वाढत जाते. व्याज, चक्रवाढ व्याज वाढते, लिलाव होतात पण याऐवजी त्याला सर्व प्रकारचे मार्गदर्शन करून त्याची परिस्थिती सुधारण्याचे प्रामा-

णिक प्रयत्न हे लोक का करत नाहीत हा खरा प्रश्न आहे. राजकीय नेते केवळ निवडणुकापुरते पाहतात. सावकार, जमिनदार स्वत:च्या फायद्याचें पाहतात. सरकारी नोकर जणू स्वत:ला काय समजतात हे समजत नाही. म्हणून आजही ग्रामीण माणसाची अवस्था बदलली नाही.

खेडचात आजही अनेक प्रश्न भेडसावत आहेत. अज्ञान-रोगराई, बेकारी, जीवनावश्यक वस्तूंची दुर्मिळता, वाढती लोकसंख्या. विषमता (सामाजिक, आर्थिक) आदी समस्यांनी 'खेडे' भयग्रस्त होऊन मुक्तीच्या मार्गाची वाट पहात आहे. हा गंभीर प्रश्न आहे. हे मोठं आव्हान आहे. ग्रामीण जनतेच्या सुखसमृद्धीसाठी आजपर्यंत कांहीच झाले नाही असे नाही जे झाले ते फारच अपुरे झाले. शासनाने नव्या विकासाच्या सुविधा निर्माण केल्या. त्याचा लाभ त्याच त्या लोकांनी करून घेतला. ज्या लोकांसाठी या विकास योजना आहेत ते त्यांना आजही माहीत नाही. हे शोषणच नाही का ? शिवाय ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली त्यांनी प्रामाणिकपणे निष्ठेने ती करण्याचा प्रयत्न केला नाही. लोकशाहीचा मार्ग, सहकाराचा मार्ग, प्रशासकीय यंत्रणेचे साह्य आदी सर्व साधनांचे साह्य घेतले जात आहे. पण प्रत्येकात दोष निर्माण होत आहेत. वास्तविक पाहता त्या पद्धतीत दोष कमी असतील. खरे दोष त्या पद्धती, ती साधनें राबवणाऱ्यात स्वार्थ दडपलेला आहे. खोटेपणा दडपलेला आहे ही प्रवृत्ती नष्ट केली पाहिजे. ग्रामीण स्वराज्य संस्था आणि इतरही संस्था ग्रामीण संघटनांनी त्यांचा कारभार स्वच्छ, निर्दोष लोकाभिमुख केल्यानंतर ग्रामीण शोषण चालूच राहणार नाही. हे पुन्हा सांगण्याची गरज नाही. तेव्हा देशाच्या उज्वल भवितव्यासाठी ग्रामीण विकास साधला पाहिजे. कारण भारत देश खेडचात वसलेला देश आहे ७० टक्क्यापेक्षा जास्त भारतीय जनता खेडचात राहते, तिच्या उपजीविकेची साधने तिथेच आहेत. म्हणून खेडयांच्या विकासाचा मार्ग अग्रक्रमाने

सोडवून तेथे होणारे कसलेही शोषण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे हे फार जिकरीचे पण महत्वाचे काम आहे. तेव्हा जनतेला पोट भरण्याची व आरोग्य रक्षणाची किमान साधने, सुविधा, किमान शिक्षण, स्वयंरोजगाराची किमान संधी प्राप्त करून देऊन शोषणरहित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न गामीण संस्थानी प्रामाणिकपणे सातत्याने आणि निष्ठेने करावा तरच खेडे सुधारेल.

पंचायत राज आणि ग्रामीण विकास

पंचायत राज संस्थांची स्थापना म्हणजे स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताने उचललेल्या महत्वपूर्ण पावलांपैकी एक अत्यंत महत्वाचे पाऊल होय. सर्वांगीण विकास जनतेच्या स्वतःच्या इच्छेप्रमाणे तिच्याच सहकार्याने आणि लोकशाही मार्गाने घडवून आणण्यासाठी पंचायत राज संस्थांची स्थापना करण्यात आली. पंचायत राज्य म्हणजे ग्रामीण व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये भारताने केलेला एक अनन्य साधारण व नाविन्यपूर्ण प्रयोग आहे, असे म्हटल्यास चूक करू नये.

पंचायत राज व्यवस्थेच्या या आधुनिक लोकशाही प्रयोगाची सुरूवात कै. बलवंतराव मेहता समितीच्या अहवालाच्या शिफारशीच्या आधारे २ ऑक्टोबर १९५९ रोजी राजस्थानपासून झाली. त्याआधी याच हेतूने २ ऑक्टोबर १९५२ पासून राबविण्यात येणाऱ्या 'समाज विकास योजनेला' अपेक्षेप्रमाणे यश न मिळाल्याने तिच्या मूल्यामापनसाठीच मेहता समिती नेमण्यात आली होती.

'भारतातील ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्यासाठी प्रतिनिधीक लोकशाही स्वरूपाच्या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करून त्या संस्थांना योग्य त्या रीतीने कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार आणि आर्थिक साधणे विकेंद्रीत करावी' अशी अशी भूमिका बलवंतराव मेहता समितीने घेतली. आणि एका त्रिस्तरीय ग्रामीण स्वराज्य संस्थांनाच्या यंत्रणेची शिफारस केली आणि तीच ही लोकशाहीचे विकेंद्रीकरण करणारी पंचायत राज पद्धती होय. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत हे या

व्यवस्थेतीत तीन स्तर असून थोड्याफार फरकाने आज संबंध देशभर ती कार्यवाहीत आहे. या व्यवस्थेमुळे अपेक्षित उद्धिष्टे पूर्णतः साध्य झाली नसली तरी ग्रामीण विकासाला मोलाचे साहय झालेले आहे हे नाकारता येत नाही. श्री व्ही. एम. सरकार यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास "Panchayat Raj is regarded as the heart of Indian politics. The health of Indian democracy dedends on its second working. It is the agency of economic peroperity, socical progress and political development. Its intitutions out as the catchment areas for the discovery of new leaders."

तेव्हा पंचायत राज्य आणि ग्रामीण विकास या संदर्भात विचार करत असताना या संस्थेच्या निर्मितीविषयी सखोल माहिती घेणे उपयुक्त होईल. कारण यावरच पुढील दिशा ठरविणे क्रम-प्राप्त ठरेल.

प्रारंभ :

श्री बलवंतराव समितीच्या शिफारशीच्या मुलाधारावर पंचायत राज्याची स्थापना सर्वप्रथम २ ऑक्टोबर १९५९ रोजी राजस्थानमध्ये करण्यात आली. त्यानंतर इतर घटक राज्यानीही तिचा स्वीकार केला. महाराष्ट्र राज्यत मात्र १ मे १९६२ पासून पंचायत राज पर्व सुरू झाले. प्रत्येक राज्याने आपापल्या सामाजिक राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीला अनुकूल असे काही बदल ती स्वीकारताना केले. म्हणून प्रत्येक घटक राज्यातील पंचायत राज्य व्यवस्था एकसारखी नाही. काही ठिकाणी द्विस्तरीय तर काही ठिकाणी त्रिस्तरीय व्यवस्था आहे. शिवाय इतरही काही वेगळेपण आहेच.

साध्य नव्हे साधन :

विकसनशील देशामध्ये सामान्य माणसाच्या वाढणाऱ्या आकांक्षा आणि त्या पूर्ण करण्यासाठी असलेली सार्वजनिक संस्थांची

कार्यशक्ती या दोन्हींमध्ये निराशा करणारी फार मोठी तफावत असते म्हणूनच भारतासारख्या मागासलेल्या परंतु विकासोन्मुख राष्ट्रांमध्ये विकास कार्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सार्वजनिक संस्थांना सुरुवातीला अपेक्षित यश मिळत नाही असे सारखे जाणवत असते या संस्थेविषयी जे विचार मांडले जातात त्यातून असा भास निर्माण होतो की, जणू या संस्था संपूर्णतः अयशस्वी व निरुपयोगी आहेत, या संस्थाविषयींच्या सशोधनातून ज्या प्रतिक्रिया व्यक्त होतात त्यासुद्धा बहुतेक निराशाजनक व प्रामुख्याने दोषाकडे बोट दाखविणाऱ्याच असतात. भारतातील पंचायत राज संस्थेविषयीसुद्धा नेमके हेच घडत आहे. झपाट्याने सर्वांगीण ग्रामीण विकास घडवून आणण्याचा उद्दिष्टाने स्थापण्यात आलेल्या या व्यवस्थेविषयीच्या आजपर्यंतच्या वाटचालीतील दोषांसोबत त्यातील गुणाचाही विचार केला पाहिजे आणि अपेक्षित ग्रामीण विकासाची प्रक्रिया नव्या जोमाने निर्दोषपणे सुरू केली पाहिजे. कारण आपला देश हा खेड्यात बसलेला आहे. जोपर्यंत खेडी सुधारणार नाहीत तोपर्यंत देशाचो सर्वांगीण प्रगती अशक्यच. खेड्यांच्या विकासासाठी ज्या अनेक उपाययोजना विविध माध्यमांद्वारे करण्यात येत आहेत त्यातील पंचायत राज हे एक अतिशय महत्त्वाचे आणि प्रभावी माध्यम आहे. पंचायत राज व्यवस्था हे साध्य नसून एक साधन आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

या व्यवस्थेचे मूल्यमापन करणारे प्राध्यापकद्वय सर्वश्री माथुर आणि इकबाल नारायण नारायण म्हणतात, ' We have not gone though a revolutionary period, but we are trying to bring about a revolution stonly, steadily. Peacefully and of by Consistent, deliberate exertion. Panchayat Raj will be one of the instruments though which we reach our cherished goals '.

पंचायत राज राष्ट्रीय समितीचे माजी अध्यक्ष स्व. श्री. जयप्रकाश नारायण यांनीही ग्राम विकासासाठी लोकशाहीच्या या विकेंद्रित पद्धतीचे समर्थन करून राष्ट्रीय विकासाला यामुळे मोठ्या

प्रमाणावर चालना मिळेल असे मत व्यक्त केले आहे. Democracy & Development' या आपल्या पुस्तकात त्यांनी ग्रामविकासाचे जे मार्ग सांगितले आहेत त्यात ग्रामपंचायतींना अतिशय महत्त्व दिले आहे. हे सर्वोत्कृष्ट साधन आहे, याच्या साहाय्याने मानवी कल्याण साध्य करावयाचे आहे.

पंचायत राज व्यवस्थेच्या स्थापनेनंतर भारतातील सर्व राज्यांमध्ये ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. ९९ टक्के खेडी आणि त्यातील ९८ टक्के ग्रामीण लोकसंख्या या ग्रामपंचायतींच्या अधिकार क्षेत्रात मोडते. १९७५ मधील माहितीनुसार देशात ३,४९४ पंचायत समित्या आणि २५३ जिल्हा परिषदा अस्तित्वात होत्या. महाराष्ट्रात २९ जिल्हा परिषदा आणि २९३ पंचायत समित्या आहेत. तर ग्रामपंचायतींची संख्या २३,९१९ आहे. वरील आकडेवारीवरून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सहज लक्षात येईल.

या विकेन्द्रीकरणामुळे ग्रामीण जीवनाचे व ग्रामीण माणसाच्या वर्तणुकीचे लोकशाहीकरण करण्याचे आणि ग्रामीण भागाचे आधुनिकीकरण आणि आणि सामाजिक-आर्थिक विकास साधण्याचे ध्येय पंचायत राज संस्थेपुढे आहे. सत्तेचे आणि अधिकाराचे विकेंद्रीकरण यामुळे व्हावे ही धारणा आहे. लोकशाही जीवनमूल्याचे शिक्षण देण्यासाठी स्वतःचा विकास स्वतःच्या प्रयत्नाने करता यावा. त्यासाठी त्यांना स्वशासनात भाग घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली. परंतु मूल्यमापनानंतर निराशाच अधिक पदरी पडते. या क्षेत्रात झालेली प्रगती अत्यंत मंद गतीने व अनेक ठिकाणी अयोग्य मार्गाने झाली असे दिसते, तरी पण या संस्था विसर्जित करून टाकाव्यात असे म्हणणे अविवेकीपणाचेच ठरेल. या संस्थांची निर्मिती एका उदात्त ध्येयाने करण्यात आली. त्यातील दोष पूर्वग्रहदुषित न ठेवता प्रामाणिकपणे शोधून त्यावर वेळीच उपाययोजना केली पाहिजे तरच ग्रामीण विकासाचे, पर्यायाने संपूर्ण राष्ट्राच्या

उत्कर्षाचे भवितव्य बाळगता येईल. कारण आपल्या देशातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त जनता खेड्यातच राहाते आणि त्यांच्या विकासासाठी तर या संस्था निर्माण केल्या आहेत.

कै. श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी एके ठिकाणी म्हटलेले आहे की, 'स्वराज्य म्हणजे चुका करण्याचा अधिकार व तो सुधारण्याची जबाबदारी याची जाणीव सर्व जनतेला दिली पाहिजे. कायदा कितीही चांगला असला तरी त्यांचा अंमल करणारे दक्ष व न्यायी नसले तर अनर्थ होतो.' ते पुढे म्हणतात की, 'नवे नेतृत्व हवे आहे, पण नवे नेतृत्व म्हणजे टोपी बदलून चाबडीत शिरलेले नसावे. अज्ञानापासून धोका नाही. धोका आहे तो चारित्र्यहीनतेपासून, शीलशून्यतेपासून' त्यांचे हे विचार आजही किती सार्थ वाटतात. श्री. मानवेंद्र रॉय यांनीही सामाजिक पुनर्रचनेच्या प्रश्नाचा नव्या भूमिकेतून विचार मांडला असून व्यक्तीच्या आर्थिक राजकीय, सामाजिक आणि इतर सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची हमी देणारे सामाजिक संबंध निर्माण केले पाहिजेत असे विचार मांडले आहेत म्हणून तर आपण पंचायत राज्याच्या माध्यमाद्वारे विकेंद्रित लोकशाही स्वीकारलेली आहे. लोकशाहीच्या या युगात जनतेचे प्रतिनिधी जास्त परिणामकारक कार्य करू शकतात असा सिद्धांत आहे. कारण त्यांचा जनतेशी जास्त संपर्क असतो व जनतेला ते विश्वासात घेऊन कार्य करू शकतात. त्या विभागाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी त्यांच्यावरच असते. जनतेनेही त्यांना उस्फूर्त सहकार्य केले पाहिजे.

पंचायत राज व्यवस्थेची कार्ये –

पंचायत राज पद्धतीचा पाया ग्रामीण विकास गट असावा असे सुचविण्यात आले आहे. शेती, लघु पाटबंधारे जमिनीची धूप थांबविणे खेड्यालगतची जंगले वाढविणे, पशुसंवर्धन, दुग्धोत्पादन, सहकारी संस्थांचा विकास, प्राथमिक शिक्षण व शाळांसाठी इमारतीची तरतूद, ग्रामोद्योग, पाणीपुरवठा, मोठ्या रस्त्यांना जोडणारे

लहान रस्ते बांधणे. आरोग्य सुधारणा, अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा, शेती लघुउद्योग वगरे उत्पादककार्यासाठी कर्ज, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्यांना सर्व प्रकारचे साह्य त्या त्या विभागातील मनुष्यशक्तीचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने हाती घ्याव्याची कामे, कच्च्या मालाची योग्य भावात विक्री व्यवस्था आणि इतर अनेक महत्त्वपूर्ण तसेच अत्यावश्यक बाबी पंचायत राज व्यवस्थेमार्फत आणि तिला साह्य करणाऱ्या इतर संस्थांच्या मदतीने पंचायतीच्या नियंत्रणाखाली निरंतरपणे व्हावयास पाहिजेत. तरच ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा प्रथमपासून करण्यात आली होती.

काही अंशी यशस्वी –

गेल्या वीस वर्षांच्या वाटचालीनंतर पंचायत राज व्यवस्थेच्या कार्याचा आढावा घेतला तर ही योजना अपेक्षित असे फार मोठे कार्य करू शकली नसती तरी पूर्णतः चुकीच्या मार्गाने अथवा अपयशी ठरली आहे असे म्हणता येणार नाही. आपल्या कक्षेत विविध पातळ्यांवर या संस्थांनी बरेच प्रशंसनीय कार्य केले आहे. अर्थात ते पुरेसे म्हणता येणार नाही. ग्रामीण रस्ते, शिक्षण, आरोग्य, दुर्बल घटकांसाठी विविध कार्यक्रम, सबलती, शेतीविकासाला साहय ठरणाऱ्या विविध सेवा, सहकारी क्षेत्राच्या विकासाला मदत इत्यादी क्षेत्रात बरेच कार्य झालेले आहे.

पण एवढ्यावरच समाधान मानावयाचे काय? पंचायत व्यवस्थेमुळे ग्रामीण विकासाला कितपत साहय झाले, वेग आला याची आकडेवारी मिळू शकेल. पण अशा वऱ्याच अंशी दिखाऊ आकडेवारीने खरा प्रश्न सुटणार आहे काय? याचे वस्तुनिष्ठ शोधन झाले पाहिजे, आणि नव्या जोमाने या व्यवस्थेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे, हे एक आव्हानच नाही काय? एवढे मात्र खरे की, या व्यवस्थेमुळे सर्व ग्रामीण जनता एका व्यासपीठावर आली आणि तिने आपल्या विकासासाठी याचा

बऱ्याच अंशी चांगला उपयोग करून घेतला आहे. यात काही चुका निश्चितच झालेल्या आहेत, हे मान्य करूनही व्यवस्था टिकावी असेच मत ग्राम ण भागातून ऐकू येते. या योजनेच्या मूल्यमापना-साठी २० वर्षांचा कालावधी पुरेसा वाटत असला तरी ही व्यवस्था जेंथे आपण ज्या प्रकारे राबविला जाते त्याचाही विचार केला पाहिजे कारण व्यापक विस्तृत क्षेत्र, अडाणी-अशिक्षित अशी भरमसाट लोकसंख्या, आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणा, समाजातर्गत विविध भेदाभेद-विषमता इत्यादी असताना ही योजना शंभर टक्के यशस्वी कशी होईल ? खरे तर कोणतीच योजना शंभर टक्के यशस्वी होत नसते. तेव्हा पंचायत राज व्यवस्थेच्या कार्याचे मूल्यामापन करताना काही गोष्टी गृहित धरून त्याचे शोधन केले पाहिजे आणि त्यात दुरुस्त्या सुचविल्या पाहिजेत

सर्व प्रथम आपण हे मान्य केलेले आहे की, ही व्यवस्था ग्रामीण विकासाला पोषक ठरलेली आहे. प्रश्न आहे तो केवळ ती अधिक निर्दोष कार्यक्षम आणि समाजाभिमुख करून समाजातील शेवटच्या माणसापर्यंत लोकशाहीची मधुर फळे प्रामाणिकपणे पोहोचविणे हा, यासाठी माणसाने स्वतःच्या विकासासाठी, स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या विविध संस्था संघटना निर्माण केल्या आहेत त्यात य ग्य समन्वय आणि सहकार्य याचा मेळ घालण अतिशय महत्त्वाचे, अग्रक्रमाचे आहे.

अग्रक्रम आणि निरंतरता हवी

ज्याप्रमाणे माणसाच्या गरजा अनंत, अमर्याद, पुनः पुन्हा उद्‌भवणाऱ्या असतात आणि त्यांच्या पूर्ततेसाठी तो उपलब्ध साधनांचा विचार करून गरजाच्या आवश्यकतेनुसार अग्रक्रम लावतो. तसेच पंचायत राज्य व्यवस्थेतही ग्राम ण जनतेचा विकास साध्य करण्यासाठी कार्यक्रमांचा अग्रक्रम लावून त्यात निरंतरता ठेऊन कार्यक्षमपणे वाटचाल केल्यास ही व्यवस्था आजच्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर यशस्वी होईल यात शंका नाही. पण खेदाने हे नमूद

करावे लागते की, पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती ज्या उद्देशाने उदात्त हेतूने करण्यात आली तो हेतू सफल होण्यास अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. 'विहिरीतून पाटावाटे सोडलेले पाणी वापर्‍या-पर्यंत पूर्णपणे पोहोचत नाही, हा शेतीतला अनुभव शासनातही येतो. जेथली कामे तेथील लोकांनी करणे योग्य. यासाठी जबाबदारीची जाणीव सर्वत्र व सर्व थरातून निर्माण झाली पाहिजे.' असे जे मत काकासाहेब गाडगीळ यांनी व्यक्त केले आहे ते या योजनेच्या यशाचे सूत्रच म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये

अडथळे आणि दोष -

वर म्हटल्याप्रमाणे पंचायत राज संस्थांनी ग्रामीण विकासाचे अनेक कार्यक्रम पार पाडले असले तरी त्याबरोबरच एकूण ग्रामीण जीवनात जो फरक पडायला हवा होता तो पडलेला नाही. ही गोष्ट खेदजनक असली तरी खरी आहे आणि त्यामुळे ग्रामीण विकासाचे पाऊलही पडावे तितके पुढे पडलेले नाही याची कारण-मीमांसा करू गेल्यावर पुढील गोष्टी लक्षात येतात.

१) सामान्य माणसाला राजकीय शिक्षण देण्यामध्ये पंचायत राज संस्था सफल होऊ शकल्या नाहीत. लोकशाही जीवन मूल्यांची सामान्य ग्रामीण नागरिकांकडून नव्हे तर नेत्यांकडूनसुद्धा सर्रास पायमल्ली होत आली आहे. गटबाजी, जात धर्म, वर्ग आदी विचारांना अग्रस्थान मिळाल्यामुळे लोकशाही मूल्यांची अवहेलना होत आली आहे.

२) पंचायत राज संस्थांना व्यापक प्रमाणात सत्ता आणि अधिकार देण्यात आलेले नाहीत. आर्थिक पाठबळ पुरेसे नसल्यामुळे अनेक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम कागदावरच राहिले आणि मिळालेल्या पैशांचा किफायतशीर उपयोग झाला नाही.

३) पंचायत राज्यातील निवडणुकांमुळे जात, धर्म, गट अधिक बळावले आहेत. यामुळे खेड्यातील शांतता संपुष्टात आली

असून सत्ता, स्वार्थ याचा हव्यास वाढला आहे. श्री. मोरारजी देसाई आणि नंतर कै. हनुमतय्या यांच्या नेतृत्वाखाली नेमण्यात आलेल्या 'प्रशासन सुधारणा आयोगाने' आपल्या अहवालात म्हटले आहे की, 'पंचायती निवडणुकांमध्ये लोकशाहीविरोधी अपप्रवृत्तीचे वर्चस्व वाढत चालले आहे. धर्म, जाति, जमाती आणि रक्तसंबंधांना प्राधान्य देण्यात येते तर योग्यता व पात्रतेला कुणी विचारत सुद्धा नाही.'

४) नवीन नतृत्व विकसित होण्याऐवजी जुनेच परंपरावादी वयोवृद्ध नतृत्व परिस्थिती बदलू देत नाही.

५) लोकांचा सहभाग मिळत नाही. रोजी–रोटी मिळविण्यातच सामान्य माणूस गढला आहे आणि त्यामुळे हे क्षेत्र आता वडचा लोकाचेच झाले आहे. जनतेचा संबंध केवळ मतदान करतानाच येतो. एका अर्थाने या क्षेत्रात 'निर्वाचित लोकशाही' किंवा 'राजकीय लोकशाहीच' Elected or Political Bureaucaly निर्माण झाली आहे.

६) जनतेचे नेते आणि सरकारी नोकर (अर्थात नियुक्त नोकरशाही), यांच्यात भांडणे आहेत, सहकार्य नाही. यामुळे सामान्यांची कामे वेळेवर होत नाहीत. वशिलेबाजी, भ्रष्टाचार, लाचलुचपत, दप्तर दिरंगाई बोकाळली आहे.

७) पंचायती आणि इतर विविध लोकोपयोगी, समाजसेवी संस्था आणि संघटना यात सहकार्य असण्याची नितांत गरज आहे.

८) पंचायत राज्याचा पाया खेडे हा आहे. पण खेडचात सावकार, व्यापारी, जमीन मालक आणि सरकारी नोकर यांच्याकडून खेडूत अज्ञानी लोकांची सतत पिळवणूक होत असते. ही पिळवणूक आर्थिक, सामाजिक आदी प्रकारची असू शकते. पंचायतराज व्यवस्थेच्या यशस्वीतेसाठी हा अडथळा दूर झाला पाहिजे.

असे अनेकविध अडथळे आणि दोष पंचायत राज व्यवस्थेत निर्माण होत असल्यामुळे आज ही व्यवस्था लोकमान्य असूनही

पूर्णतः यशस्वी होऊ शकली नाही. यासाठी काही परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे, देशाच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम म्हणून या व्यवस्थेला असाधारण स्थान आहे. खेड्यांचा कायापालट करण्याचे एक साधन म्हणून या व्यवस्थेकडे आपण पाहतो. त्यासाठी पुढील काही उपाय अथवा सूचनांचा विचार केला पाहिजे.

१) जनतेला लोकशाही शिक्षण संस्कार द्यावेत. स्वतः नेत्यांनी ते आचरणात आणावेत.

२) एकाच व्यक्तीने अनेक पदे सांभाळू नयेत. उदा. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीचा अध्यक्ष अथवा सभापतीने सहकारी साखर कारखाने, सहकारी बँकांचे चेअरमन होऊ नये. अथवा आमदार, खासदार होऊ नये. सत्तेचे खरेखुरे विकेंद्रीकरण व्हावे. नेतृत्व खालच्या वर्गाकडे जावे.

३) स्व. जयप्रकाश नारायण यांनी म्हटल्याप्रमाणे 'माणूस हा एका जबाबदार समाजाचा एक जबाबदार घटक आहे' याचे भान प्रत्येक नागरिकाला असावे.

४) पैशाचा अपव्यय टाळण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणा कार्यक्षम असावा.

५) पंचायत समिती व पंचायती यांनी वाढत्या शेती-उत्पादनावर भर द्यावा.

६) पंचायत समिती व पंचायती यांनी लोकांचे जीवनमान वाढावे यासाठी खास लक्ष द्यावे व उत्पादन कार्यक्रमात सर्वतोपरी साह्य द्यावे.

७) बलवंतराव मेहता यांनी म्हटल्याप्रमाणे या तिन्ही संस्थांनी राज्य व केंद्र सरकारची बांडगुळे म्हणून काम न करता राज्याचा लोकसत्ताक स्वायत्त प्रतिनिधी म्हणून काम करावे.

८) सहकाराने सामाजिक न्याय आणि आर्थिक समता एकत्रित आणली पाहिजे. विकास व नियोजन यात सुसूत्रता हवी. सतत वाढणाऱ्या लोकसंस्थेमुळे व एकूण राहणीमान वाढल्यामुळे शतीची जोपासना जरी आधुनिक पद्धतीने केली व उत्पन्न वाढविले तरीसुद्धा निवळ शेतीवर लोकांचा निर्वाह होणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. ग्रामीण जनतेचे जीवन विस्कळीत होऊ न देता त्यांच्यावर स्थलांतर करण्याची पाळी न आणता त्याच्या जीवन-मानाचा प्रश्न सोडविणे हीच आजच्या युगाची समस्या आहे. विकेंद्रीकरण कायद्यानुसार स्थानिक उद्योगधंदे व स्थानिक कला (हस्तकला वगैरे) यांच्या संवर्धनाची जबाबदारी परिषदावर व समित्यांवर टाकली आहे. खेड्यातील (विणकर, लोहार; सुतार, चर्मकार इत्यादी) ग्रामीण कारागिरातर्फे बऱ्याच मोठ्या प्रमाणात खेड्यातील गरजा भागविल्या जात आहेत. तिच्यावर आधुनिकतेचे योग्य संस्कार झाले, त्यांची उत्पादन क्षमता वाढली, त्यात सुबत्ता आली, यंत्रतंत्राचे साह्य दिले तर मदत होईल.

९) शहरातील दिखाऊ चकमकीकडे खेड्यातील नव्या पिढीचा कल वाढला आहे. तसेच कामाच्या शोधामुळेही खेड्यातील अशिक्षित आणि शिकलेले तरुण खेड्यातून शहराकडे वळले आहेत. यामुळे खेडी ओसाड होत असून शहरात मात्र वाढली गर्दी, ही समस्याच ठरली आहे शहराकडे धावणारा हा लोढा परिषदांनी थांबविण्यास मदत केली पाहिजे.

१०) पंचायत राज सुरू झाल्यापासून प्राथमिक शिक्षण हा बाब जिल्हा परिषदाच्या कार्यक्षेत्रातील एक महत्त्वाची बाब झाला आहे. साहजिकच जीवन शिक्षणाचा प्रसार व त्यात इष्ट ते बदल घडवून आणण्याचा जबाबदारी त्यांच्यावर आहे. याचे महत्त्व लक्षात घेऊन कार्य केले पाहिजे.

११) आपल्या देशाची लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे आणि त्याचे विपरीत परिणाम होत आहे म्हणून त्याला

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर 3903 ग्रंथ क्र. 9933 वर्ग क्र. 370.954 दिनांक 1990

आळा घालण्यासाठी पंचायतींनी परिणामकारक कार्य करण्याची आवश्यकता आहे तसेच ग्रामीण भागापर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

१२) वेळोवेळी सभा, संमेलने, मेळावे, शिबिरे, स्पर्धा इत्यादी घेऊन ग्रामीण भागात नवी माहिती, ज्ञान, प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न व्हावा.

१३) ग्रामीण भागातील लोकांचे जीवन शेतीवर अवलंबून असते. तेव्हा शेतीच्या मालाला योग्य भाव मिळावा, शेतमजुरांना निर्वाह दाम वेतन मिळावे, जीवनावश्यक वस्तूंचा रास्त दरात पुरवठा व्हावा यासारखी महत्त्वाची कामे पंचायतींना सातत्याने लक्ष ठेऊन करावीत.

१४) ग्रामीण रस्त्यांचें काम अजूनही अपुरेच आहे. विद्युत आणि जलसिचनाची मागणी वाढतो आहे याचा विचार करून या महत्त्वाच्या सुविधा लवकरात लवकर कराव्यात.

१५) ग्रामीण भागात अशिक्षित मजूर (अंग मेहनतीचे काम करणारा) मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना सातत्याने काम देण्याचे प्रयत्न करण्यात यावे आणि त्यासाठी योग्य कामे काढण्याकडे लक्ष द्यावे.

१६) जिल्हाधिकारी, तहसीलदार, बॅन्क अधिकारी, पोलिस प्रमुख आदी महत्त्वाच्या सनदी नोकराशी पंचायत राजव्यवस्थेतील लोकांचे संबंध चांगले असावे. त्यांच्यात सहकार्य असावे. यामुळे ग्रामीण भागात शांतता नांदण्यास बरीच मदत होईल.

१७) कोणताही विकास कार्यक्रम राबविण्यासाठी पैसा आवश्यक असतो. १४ बॅंकांच्या राष्ट्रीकरणानंतर ग्रामीण भागात शेती आणि विविध उद्योगधंदे आदीसाठी पैसा मुबलक प्रमाणात दिला जात आहे. डिसेंबर १९७८ पर्यंत ४०० कोटी रुपये कर्जाऊ दिले आहेत. पण त्याचा हवा तसा उपयोग होत नाही. थकबाक्या

राष्ट्रीय संकट ठरल्या आहेत. रिझर्व्ह बँकेने ग्रामीण विकासासाठी उदार धोरण ठेवले आहे पण ग्रामीण नेते याकडे लक्ष देत नाहीत. अधिकारीवर्गही मनापासून कार्य करतोच असे नाही याचा विचार व्हावा. काही सधन लोकच पुन्हा हे फायदे घेताना दिसतात. गरिबासाठी पंचायतींनी झटून कार्य करावयास हवे.

सारांशाने पंचायत राज्याचा पाया खेडे आहे म्हणून त्यातील जनतेला पोट भरण्याची व आरोग्य रक्षणाची किमान साधने, सुविधा, किमान शिक्षण व स्वयंरोजगाराचा संधी तसेच आर्थिकदृष्टचा मागासलेपणा आणि शेकडो वर्षांपासून सामाजिकदृष्टचा बहिष्कृत केलेल्या समाजाला सामाजिक न्याय आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी पंचायत राज्याने प्रयत्न करावेत. पंचायत राज्याद्वारे खरीखुरी लोकशाही जीवनपद्धती निर्माण करण्याचा प्रयत्न व्हावा. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणें भारत हा खेडचातच राहाता आणि या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला पंचायत राज व्यवस्था अतिशय अनुकूल आहे. तिच्या निर्दोष, कार्यक्षम, जनताभिमुख कार्यावरच ग्रामीण विकास अवलंबून आहे. यासाठी भरपूर वावहो आहे पण जनतेचाहा त्यात सक्रिय सहभाग हवा. कारण लोकशाहीत जनतेच्या सहकार्याशिवाय कोणतीच योजना सफल हात नाही. १९८४ मध्ये महाराष्ट्र सरकारने राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी प्राचार्य पं. वी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. ही समिती राज्यातील पंचायत राज व्यवस्थेचा अभ्यास करून शासनाला शिफारशी करणार आहे. समितीने विभागवार व जिल्हावार बैठका घेऊन प्रश्नावली भरून मूल्यमापनाचे अध्ययनाचे कार्य सुरू केले आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्य देशात पंचायत राज्य व्यवस्थेच्या कायक्रमात यशस्वी व मार्गदर्शक कार्य करणारे म्हणून गणले गेलेले आहे.

अपंग कल्याण – एक सामाजिक जबाबदारी

आजच्या भारतापुढे ज्या काही कठीण समस्या उभ्या आहेत त्यापैकी अपंगाचा प्रश्न हो अतिशय करुण आणि अतिशय दारूण अशी समस्या आहे. खुद्द महाराष्ट्रातच अपंग माणसाची संस्था एक लाखावर असून त्यामध्ये मुके, बहिरे, आंधळे, लुळे, पांगळे, आणि अन्य तऱ्हने दुर्बल आणि पराधिन असलेल्यांचा समावेश आहे. भारतातील कुष्टरोगी धरून अंपगाच्या सख्येचा स्थूल अंदाज ३० लाखाच्या आसपास केला जातो याखेरीज वृद्धांचा आणि असाध्य रोगाने त्रस्त झालेल्या रोग्याचा प्रश्नच वेगळा. म्हणूनच अपंगाचे पुनर्वसन आणि कल्याण जबाबदारी आहे. या कार्याची पूर्तता केवळ पगारी नोकरवर्गाकडून शासनसंस्था साध्य करू शकणार नाही. विविध कार्याला वाहून घेतलेल्या खाजगी संस्था–सघटनांची त्याग आणि सेवाभावी वृत्तीच्या प्रेरणेने प्रभावित झालेल्या कार्यकर्त्यांची फळी कामाच्या यशासाठी आवश्यक आहे खाजगी व्यापक प्रयत्न, सरकारी मदत आणि देखरेख याचा योग्य सहयोग साधूनच हे महत्त्वाचे कार्य केले पाहिजे. यासाठी युवकांनी आपली शक्ती खर्च केलीस फार मोठे विधायक व रचनात्मक कार्य तर होईलच, परतु अपगासारख्या उपेक्षितांनाह आश्रय मिळेल. निसर्गाने त्यांच्यावर केलेल्या अन्यायावर ते काही प्रमाणात तरी यश मिळवू शकतील

अपंग वर्ष १९८१

समाजात निर्माण झालेल्या अथवा होणाऱ्या प्रश्नाकडे सर्वाचे लक्ष वेधून घेऊन त्या प्रश्नांची तीव्रता, गांभीर्य लक्षात आणून

देण्यासाठी आणि तो प्रश्न सर्वांच्या सहकार्याने सोडविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न केले जातात. म्हणूनच १९८१ हे चालू वर्ष जागतिक पातळीवर अपंग वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. १९८० हे वर्ष 'बालक वर्ष' म्हणून गौरविले गेले आणि बाल कल्याणाच्या बाबतीत सर्व दृष्टीने विचार करण्यात आला. काही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचा संकल्प झाला आणि बऱ्याच प्रमाणात अंमलबजावणीही झाली. तद्वतच १९८१ हे चालू वर्ष अपंगाच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अपंग वर्ष म्हणून साजरे होत आहे.

समाजसेवकांना नवे आव्हान –

अपंग आणि निराधार समाज घटकाकडे त्या त्या समाजातील लोक किती आस्थेवाईकपणे लक्ष देतात त्यावर त्या त्या समाजाची सांस्कृतिक पातळी कोणत्या दर्जाची आहे हे ठरविता येईल. त्या दृष्टीने विचार केला असता आम्हा भारतीयांना अजून बरीच मजल गाठावयाची आहे असे म्हटले पाहिजे. अपंगाचा प्रश्न हा समाजसेवकांना विशेषत: नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना एक मोठे आव्हान आहे असे मानले पाहिजे. धडधाकट तरुणांनी आपल्याच समाजातील अंगांच्या हितसंर्धनासाठी कार्य हाती घेतल्यास ते एक फार मोठे मानवी आणि राष्ट्रीय हिताचे कार्य होणार आहे.

चार कलमी कार्यक्रम –

अंपगांच्या कल्यासाठी आपण प्रामुख्याने चार गोष्टी करू शकतो.

१) अपंगाना योग्य आणि वेळेवर उपचार मिळण्याची व्यवस्था करणे,

२) अपंग मुलांना त्यांचे व्यंग लक्षात घेऊन योग्य शिक्षण देण्याची व्यवस्था करणे,

३) अपंगाना व्यवसाय मिळवून देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे आणि

४) अपंग आणि त्याचे कुटुंबीय यांचा समाजात योग्य स्थान मिळवून देऊन भावनिक पुनर्वसन करणे.

ज्या प्रमाणात आपण अपंगांना आर्थिकदृष्टचा स्वावलबी करू शकू त्या प्रमामात अपगांना सामाजिक स्थान मिळण्यास मदत होईल.

आर्थिक स्वावलंबनामुळे अपंगांचा आत्मविश्वास वाढतो. आपणही समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून स्वाभिमानाची व प्रतिष्ठेची भावना जागृत होते आणि आपले जीवन दुसऱ्यांना निष्कारण भारभूत नाही असे त्यांना वाटू लागते. अपंग स्त्री पुरुषांचे एकमेकांमध्ये वा धडधाकट व्यक्तीशी विवाह जमवून आणून त्यांना एक कौटुंबिक जीवन जगण्याची संधी देणे आणि त्याद्वारे त्याचे भावनिक पुनर्वसन करणे, प्रेमाची जवळची माणसे जोडणे हे कार्यही करता येण्यासारखे आहे.

अपंगाचे व्यावसायिक अथवा आर्थिक पुनर्वसन करणे हे कल्याणकारी राज्याचे कतव्यच आहे. परंतु आपल्या समाजात जेथे धडधाकट स्त्री–पुरुषांना पुरेषा प्रमाणात काम मिळत नाही त्या ठिकाणी अपंगांचो व्यावसायिक सोय करणे अवघड काम आहे असे वाटत असले तरी, सामाजिक जबाबदारीच्या व कर्तव्याच्या भावनेने अपंगांना संधी दिली पाहिजे.

समाजाने आणि शासनाने अपंगांचा कल्याणकारी कार्यक्रम हा परोपकाराच्या भावनेतून नव्हे तर एक पवित्र सेवा किंवा माणुसकीचे प्राथमिक कर्तव्य या नात्याने पार पाडले पाहिजे. अपंगांवर निसर्गाचा एवढा मोठा अन्याय झालेला असतो की, इतरांनी त्यांच्यासाठी कितीही परिश्रम घेतले तरी सामाजिक कर्तव्याची परिपूर्ती झाली असे म्हणता येणार नाही. मूक–बधिरांचे निःशब्द जीवन, अंधांचे अंधकारमय विश्व, लुळ्या–पांगळ्या असहायता, कुष्ट रोग्यांवर झालेला निसर्गाचा निर्घृण आघात

आणि त्यांचे दुःखी जीवन पाहिल्यावर कोणाही सुसंस्कृत, सहृदयी माणसाला अपंगांबद्दल आपुलकीची भावना आणि कर्तव्यपूर्तीची आकांक्षा निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. अपंगांची आणि कुष्ठरोग्यांची सेवा हे व्रीद गांधीजींनीही आपल्या आयुष्यात अंगीकारले होते. आपल्या धकाधकीच्या जीवनातदेखील त्यांनी या व्याधिग्रस्त लोकाबद्दल खूप कष्ट घेतले. 'स्वराज्याच्या धामधुमीत मी गुंतलो नसतो तर अपंग आणि कुष्टरोग्यांच्या सेवेत मी माझे आयुष्य वेचले असते.' असे त्यांनी म्हटले आहे. आमच्या तरुण युवक मित्रांनी गांधीजींचे हे बोल लक्षात घेतले पाहिजेत.

प्रत्येक माणसाला आयुष्याच्या शेवटी येणारे म्हातारपण हे एकप्रकारचे अपंगत्वच होय. ज्या माणसाने जन्मभर कष्ट केले आहेत. त्या माणसाला आयुष्याच्या संध्याकाळी सुखाची विश्रांती, आवडीचे काम करण्याची सधी, चार गोड शब्दांची आणि प्रेमाची वागणूक मिळणार नसेल तर त्यांचे जीवन किती दुःखी आणि त्यांची चित्त किती व्याकूळ होत असेल याचे वेगळे वर्णन करायला नको. अलीकडे औद्योगीकरण, शहरीकरण यामुळे कुटुंबसस्था उध्वस्त होत आहे. यामुळे वृद्धाचे जीवन दुःखमय होत आहे याचाही विचार झाला पाहिजे.

ग्रामीण भागापर्यंत कार्य हवे :

वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि अन्य शोधामुळे शारीरिक-दृष्ट्या अपगाचे जीवन सुसह्य होण्यास मदत झाली आहे. कृत्रिम अवयवामुळे त्यांचे जिणे आता सुसह्य होऊ शकते. शासनाकडूनही विविध प्रकारे साह्य होऊ शकते. परंतु हे सर्व शहरी भागातच शक्य होते. काही स्वयंसेवी संस्था व संघटनादेखील अशा कार्यात गुंतलेल्या आहेत. परंतु त्यांचे कामही बव्हंशी शहरी भागात होते. दूरदूरच्या आडवळणी ग्रामीण भागात मोठ्या संख्येने असलेल्या अपंगांना, कुष्टरोगासारख्या रोगाने जर्जर झालेल्या लोकांना शासनाच्या आणि स्वयंसेवी सेवाभावी संस्थांच्या कार्याची माहिती

नसल्यामुळे ते बहुसंख्य लोक तिथेच दुःखी जीवन जगतात. ग्रामीण भाग तोल व दुगम क्षेत्रातील अशा दुःखी माणसांना अशा संस्था संघटनांची माहिती देण्याचे तसेच शहरात अथवा जेथे त्यांची सोय असेल तेथपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले पाहिजे याबाबतीत निःस्वार्थी, सेवाभावी मध्यस्थाची भूमिका युवकांनी बजावयास हवी.

धडपड-यंत्राची व अपंगाची

आनंदवन, घायपातळी वाडी, चेम्बूर, विहार चिंचई इत्यादी ठिकाणाच्या संस्थांचे कार्य तसेच वरोरा, अमरावती चंपा आणि इतर ठिकाणी कुष्टरोग्याच्या पुनर्वसनासाठी चाललेल्या कार्यांची माहिती अनेकांनी वाचली असेल त्या संस्थांचा आणि तेथील कार्याचा आदर्श तरुणांनी पुढे ठेवायला काय हरकत आहे.

वर उल्लेखिलेल्या संस्थांच्या तसेच इतरत्र ठिकाणच्या अन्य संस्था संघटनांच्या कार्यांमुळेच आज आमचे अपंग बांधव अनेक प्रकारच्या उद्योग व्यवसायात फार मोठ्या संख्येने निष्णातपणे कार्य करताना दिसतात. छपाई, उद्योग, यंत्र जुळवणी, प्लास्टिक काम, लाद्या तयार करणे, बुक बाइंडिंग, शिलाईकाम, चर्मकाम इ. कितीतरी कामात गुंतलेले आहेत. यंत्राच्या धडधडीबरोबर अपंगाची धडपड वाढत आहे. त्यांचे संवेदनाशील मन लाकडी यांत्रिक हातापायातूनसुद्धा संवेदनांचा जागृत अनुभव घेत आहे.

आज आपल्या देशात १ कोटी २० लाख अपंग आहेत. जागतिक अपंग संघटनेच्या आदेशाप्रमाणे प्रत्येक वर्षी मार्च महिन्याचा तिसरा रविवार हा 'अपंग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्र राज्यात अपंग कल्याणाचे कार्य समाज कल्याण मंत्रालय आणि विविध समाजसेवी संस्थांद्वारे होत आहे. अपंग कल्याणाच्या या कार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून 'अपंग कल्याण सेवक' असे पुरस्कार शासनाच्या वतीने देण्यात येतात. महाराष्ट्र राज्य देशात सर्वात आघाडीवर आहे आणि सर्व विकसनशील देशात भारताने या क्षेत्रात फार मोठे कार्य केलेले आहे व यापुढेही करणार आहेच.

अपंग कल्याणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, संघटनांची संख्या वाढली पाहिजे. काही ठिकाणी लायन्स, रोटरी क्लबसारख्या संस्थाही कार्य करताना दिसून येतात. महाविद्यालयात असणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनाद्वारेही या संदर्भात कांहीसे कार्य होते. पण प्रारंभी अपंगत्व येऊ नये म्हणूनच काळजी घेण्यासंदर्भात जनतेमध्ये जागृती केली पाहिजे. अंधत्व, शरीरातील अवयवाचे अपंगत्व येऊ नये म्हणून स्त्री गरोदर असल्यापासूनच काळजी घ्यावी, मूल जन्मल्यावर त्याला सर्व पौष्टीक आहार द्यावेत. वेगवेगळ्या लसीची इंजेक्शन्स द्यावीत म्हणजे अपंगत्व येऊ नये म्हणून प्राथमिक काळजा घेतल्यास वऱ्याच मोठ्या प्रमाणात भविष्यात येणारे अपंगत्व होऊ शकणार नाहीत. तेव्हा मूल जन्मल्या अगोदरपासून ते त्याची पूर्ण वाढ होईपर्यंत काळजी घ्यावी. अपघाताने अपंगत्व आल्यास त्यावर शक्य तेवढे उपाय वेळीच योजावेत. तेव्हा अपंग कल्याण ही सरकारप्रमाणे समाजाचीही जबाबदारी आहे, म्हणून या क्षेत्रात जाणीवपूर्वक कार्य करण्याची गरज आहे.

अशा दुःखितांना सर्वप्रथम आपलेसे केले ते सिद्धार्थांनी, महात्मा गांधींनी आणि आज बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन, अनुताई वाघ, विजय मर्चंट, यांसारखें समाजसेवक हे कार्य करीत आहेत. हे सर्व आम्हा तरुणांनी डोळसपणे पाहिले पाहिजे, लक्षात घेतले पाहिजे आणि त्यादृष्टीने अपगांच्या कल्याणासाठी काही तरी करण्याचा आपला वाटा उचलाला पाहिजे. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.' ही संत तुकारामाची उक्ती आपण आचरणात आणली तर अपंग कल्याणाच्या दृष्टीने एक नवा टप्पा आपण स्वीकारल्याचे सत्कार्य होईल.

राष्ट्रीय एकात्मता

आज बदलत्या वैज्ञानिक युगात जीवन क्षणाक्षणाला नवे रूप घेत आहे. आज त्यानुसारच नव्या संस्काराची, नव्या जाणीवांची गरज आहे. ज्यात सामाजिक एकता, धर्मनिरपेक्षता, जातिविहिन समाज, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रीय एकात्मता या विचारांची गरज आहे, खरे तर आजची महत्त्वाची गरज आहे राष्ट्रीय एकात्म भावनेची. शेकडो अणुबॉम्बच्या शक्तीपेक्षाही राष्ट्रीय एकात्मतेची शक्ती ही प्रचंड असते. कारण राष्ट्रीय एकात्मता ही जरी अदृश्य वस्तू असली, अभौतिक स्वरूपाची बाब असली तरी तिची शक्ती, तिची उपयुक्तता, तिची श्रेष्ठता ही अणुबॉम्ब तयार करणाऱ्या राष्ट्रानीही मान्य केलेली आहे. नव्हे तर राष्ट्र या संकल्पनेत 'एक राष्ट्रीयत्वाची भावना' ही पायाभूत घटक असणारी बाब होय. राज्यशास्त्राच्या भाषेतच बोलावयाचे झाल्यास एका राज्याच्या देशाच्या निर्मितीसाठी भूप्रदेश, लोकसंख्या, शासन संस्था आणि सार्वभौमत्व ही चार अत्यावश्यक घटक असणे अत्यावश्यक असते.' तद्वतच त्यात एकात्म समाजाची अर्थात एका सार्वभौम सत्तेखाली एकोप्याने नांदण्यास जीवन जगण्यास कटिबद्ध असलेल्या जनतेची आवश्यकता असते. ही एकत्र राहण्याची जी भावना आहे तीच राष्ट्रीय एकात्मता होय. देशातील तमाम जनतेच्या एकात्मतेतच त्या राष्ट्राचे सामर्थ्य असते. या अद्भुत शक्तीच्या आधारावरच राष्ट्रातील आम जनतेला एका धाग्याने, एका सद्भावनेने एकत्रित आणता येते. भिन्न धर्म, जात, पंथ, वर्ग भाषा, भूप्रदेश अशी विविधता असलेला समाज राष्ट्रीय एकात्मतेच्या विचाराने एकत्रित येत असतो. तिथे संकुचित विचा-

रांना गौण स्थान असते, परस्पर सहकार्य, समजुतदारपणा, बंधुभाव, समता, न्याय, स्वातंत्र्य या विचाराचे अधिष्ठान हे राष्ट्रीय एकात्मतेचा मुलाधार असतो. 'एक सर्वासाठी आणि सर्व एकासाठी' हो कल्पना या एकात्मतेच्या विचारात असते म्हणूनच असा समाज, असा देश कोणत्याही नैसर्गिक अथवा कृत्रिम संकटांना हसतमुखाने सामोरे जातो. अवर्षण असो, पूर असो, रोगराई असो, भूकंप असो अथवा दुसऱ्या राष्ट्राने लादलेले युद्ध असो. अशा कोणत्याही संकटात देशातील सर्व जनता आपले तात्कालीन मतभेद विसरून या संकटाचा मुकाबला करण्यासाठी समर्थपणे एकसंघ होतात. आपल्या देशावर अशी संकटे अनेक वेळा आली तेव्हा संपूर्ण भारतीय समाजाने हेच दाखवून दिलेले आहे.

अणुबाँबसारखो शक्ती दुसऱ्या समाजाची राखरांगोळी करू शकतील पण एकात्मतेची भावना मानवता, सद्भावना, सहकार्य आदी सद्गुणांना वाढीला लाऊन एक सौजन्याचे वातावरण निर्माण करते. आमच्या देशातील राष्ट्रीय एकात्मता ही अनेकविध कारणांनी अनेक वेळा दुभंगलेली दिसून येते. असे अनेक बरे वाईट प्रसंग आमच्यावर आलेले आहेत. आम्ही आमच्या इतिहासाकडे सहज दृष्टिक्षेप टाकला तर हे स्पष्ट दिसून येते की, शेकडो वर्षापासून परकीयांनी आमच्या देशातील विविधतेचा फायदा घेऊन हल्ले केले आणि भारतीय एकात्मतेची जणू परीक्षाच पाहिली. अशा अनेक प्रसंगातून आम्ही ताऊनसुलाखून निघालेलो आहोत. राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व आमच्या देशातील जनतेला, राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नेत्यांना समजलेले आहे, म्हणूनच आमच्यावर सातत्याने आघात होऊनही आम्ही एकसंघ भारताची प्रतिमा, प्रतिष्ठा आणि प्रगती वृद्धींगत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कामात काही समाजकंटक, राष्ट्रद्रोही आणि विघटनवादी शक्ती अडथळे निर्माण करतात पण त्यांनाही वेळीच समर्थपणे धडा शिकविण्याचे त्यांच्या राष्ट्रविरोधी कारवायांना थांबविण्याचे कार्य केंद्र सरकारद्वारे केलेले आहे हे पंजाबच्या उदाहरणाने

दाखवून दिलेले आहे. यातून आमच्या राष्ट्रीय ऐक्याचे, सामर्थ्याचे दर्शन जगाला झाल्याशिवाय राहिले नाही. ही आम्हा भारतीयांसाठी अभिमानाचीच बाब होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्ही केलेली अभूतपूर्व प्रगती, जिंकलेली तीन मोठी युद्धे, नैसर्गिक संघटकांना दर वर्षीच सातत्याने, समर्थपणे दिलेले तोंड, जगातील मानवतावादी, स्वातंत्र्यवादी. आणि प्रागतिक चळवळीला दिलेला सक्रिय पाठिंबा व त्यातून निर्माण झालेली भारताची जागतिक राजकारणातील प्रतिमा, प्रतिष्ठा, जगातील नेतृत्व करण्याची संधी या सर्व घटनामागे भारताची राष्ट्रीय एकात्मताच कारणीभूत आहे. सारा देश केंद्र सरकारच्या पाठीमाग समर्थपणे तन–मन–धनासह उभा राहीला म्हणून आपण आज जगात सन्मानाने एक शक्ती म्हणून ओळखला जातो. या ऐवजी जर आपल्या देशातील वेगवेगळे प्रांत विभाग त्यातील भिन्न धर्म, जाती, वर्ग, भाषा यांच्यात सातत्याने कलह होत असेल, ते परस्पर द्वेषाने आणि परस्परविरोधी लढण्यास उठत असतील तर एकसंघ भारताची शक्तीच संपते. आज देशातील २२ घटक राज्य आणि ९ केंद्र शासित प्रदेश आणि त्यातील जवळपास ७० कोटी जनता राष्ट्रीय एकात्मतेच्या धाग्याने जोडलेली आहे म्हणून आपल्या देशाला जगात सन्मान आहे अन्यथा या देशाचे अस्तित्त्वच टिकले नसते ही वस्तुस्थिती आहे. याचा आम्ही भारतीयांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. भाषा, धर्म, प्रांतवाद, अशा संकुचित विचारांना आम्ही सोडले पाहिजे. या प्रत्येक घटकांचे, भिन्नतेचे त्या त्या ठिकाणी स्थानिक पातळीवर, वैयक्तिक पातळीवर एक असाधारण महत्त्व आहे. हे महत्त्व केंद्र सरकारही नाकारीत नाही. देशातील सर्व धर्मांचा, जातीचा, भाषांचा, प्रांतांचा, उचित सन्मान केला जातो. त्याचे महत्त्व कोणीही नाकारीत नाही, त्याची अवहेलना करीत नाही. काही स्वार्थी, अतिरेकी व्यक्ती आणि संस्था मात्र स्वतःच्या स्वार्थासाठी राष्ट्रीय ऐक्यावर, एकसंघ समाजावर संकटे आणतात. सामाजिक ऐक्य बिघडवतात व प्रगतीतील अडथळे बनतात. अशा

शक्तींना वेळीच थोपविले पाहिजे. आणि हे कार्य तरुणांचेच आहे. मी प्रथम भारतीय आहे. मी कुण्या जातीचा ना धर्माचा.

आमच्या देशात राष्ट्रीय एकात्मता नाही असे नाही ती आहे पण ती क्षणिक प्रगट होते. जेंव्हा संकट ओसरते तेंव्हा ती त्वरित लुप्त होते, हीच दुर्दैवाची बाब होय. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार हा सातत्याने प्रज्वलीत राहणारा विचार आहे. तो अखंड प्रज्वलीत राहिला पाहिजे, तरच देशाचे अखंडत्व टिकेल. देश सामर्थ्यशाली बनेल. अखंडत्वाची भावना तरुणांच्या मनात रुजली पाहिजे आपल्या देशाच्या राज्यघटनेच्या सरनाम्यात हे स्पष्टच केलेले आहे की, 'आम्ही भारताची जनता भारताचे एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक निर्माण करण्याचे ठरवून नागरिकांना स्वातंत्र्य, समता, भातृभाव वाढावा या करिता कष्टबद्ध आहोत.' हा विचार आम्ही सर्वत्र जोपासला पाहिजे. भारतीय राज्यघटनचे हे उच्च ध्येय आणि दिशा राष्ट्रीय ऐक्या-साठीच आहे

आपल्या सुदैवाने देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असणारी राज्य घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली आहे. त्यामुळ एक उत्तम चौकट आणि भक्कम पाया प्राप्त झाला आहे राष्ट्राय एकात्मतेसदर्भात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात की, "उद्याच्या भारतात क्षुद्र आणि संकुचित अशी जातीय, भाषिक, आणि प्रादेशिक भांडणे यांचा अभाव असेल कोणत्याही व्यक्तीला आपल्या इच्छेप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे कार्य करण्याची संधी मिळेल देशाच्या कोणत्याही भागात समान नागरिकत्व आहे. त्यामुळे कोणाचीही संधी डावलली जाणार नाही. लोकशाही व समाजवाद या दोन्ही कल्पनांशी विसगत असलेले जातीय भेद, वर्ण-भेद, नामशेष झालेले असतील, व्हावेत यासाठी सर्व भारती यांनी प्रयत्न केले पाहिजेत व एकसंघ भारत, बलशाली भारत बनविण्यात सहभागी व्हावे. राष्ट्रीय एकात्मतेतच ही शक्ती आहे.

राष्ट्रीय एकात्मते संदर्भात थोर नेत्यांनी आपले विचार पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे.

महात्मा गांधीच्या शब्दात विविधतेतून एकता

'आपण स्वतःला हिंदू, मुसलमान किंवा ख्रिश्चन संबोधित असतो. तरी या विविधतेतच एक अभेद्य अशी एकता आहे.

एक धर्म आजची गरज नसून विविध धर्मांबद्दल सहिष्णुता आणि परस्परासंबंधी आत्मीयता हीच खरी काळाची गरज आहे. आपल्याला विविधतेतून एकता साधावयाची आहे. आपल्या पूर्व-परंपरा आणि रूढी तसेच सहिष्णुतेचे वातावरण यावर हल्ला करणे हे केवळ फोलच ठरणार नाही तर तो पावित्र्यभंगही ठरेल. विविध धर्मांच्या शिकवणुकीची माध्यमे विभिन्न असली तरी त्याचा मूळ गाभा एकच आहे. हा गाभा सदैव अबाधित राहील. विवेकी माणूस मात्र बाह्य गोष्टीकडे दुर्लक्ष करून अंतरात्म्याकडे आपले लक्ष केंद्रीत करतो. मी हिंदू तू मुसलमान, तू गुजराथी मी मद्रासी हे सर्व भेदभाव विसरून जा. मी आणि तुम्ही मिळूनच भारतीय राष्ट्रीयत्व तयार होणार आहे ही गोष्ट मनावर ठसवा. जेव्हा जास्तीत जास्त लोकांत एकतेची भावना रूजेल तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने मुक्त होऊ भारतीयांच्या मनाची व हृदयाची एकी हवी.'

जवाहरलाल नेहरूंच्यामते "स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासमोर मूलभूत प्रश्न राष्ट्रीय एकात्मतेचा आहे. राजकीय एकात्मता पूर्ण झाली तरी ती पुरेशी नाही. आपण राजकीय ऐक्यापेक्षा जास्त मूलभूत स्वरूपाचा बदल करावयास हवा. यास विलंब लागेल. हे काम केवळ कायद्याने होणार नाही. त्याच्या वृद्धीसाठी योग्य ते वातावरण निर्माण करणे आवश्यक असून त्यास प्राधान्य दिले पाहिजे. म्हणून भारतासमोरील आजचा प्रश्न राजकीय ऐक्यापेक्षा मानसिक एकात्मतेचा आहे. प्रांतवाद, जातीयवाद वगैरे देशाच्या ऐक्यावर हल्ला करणारे वाद नष्ट करून देशाची एकात्मता बळकट करायलाच हवी.

राजकीय ऐक्य काही प्रमाणात साध्य झाले आहे पण अशा प्रकारच्या एकात्मतेसाठी झटले पाहिजे की जेथे भावनिक पातळीवर

भारतीय लोक एकत्र होतील आणि त्याचवेळी आपले वेगळे असे वैशिष्ट्यही कायम राखतील. आपले हे वेगळे असे वैशिष्ट्य पूर्ण-पणे नष्ट करायला हवे असे मी म्हणत नाही. पण आपण मतभेद भांडणे यांपासून स्वतःला दूर ठेवावयास हवे. कधी कधी इतरांची आपल्याला मान्य नसणारी मतेही स्वीकारावी लागतील कारण तो लोकशाहीचा आत्मा आहे.

या मार्गानेच आम्ही काँग्रेसमध्ये ४० वर्षे कार्य केले. मी जेव्हा राष्ट्रीय एकात्मता म्हणतो तेव्हा मला फक्त घटनात्मक आणि कायदेशीर एकात्मता अभिप्रेत नसते तर भारतीय लोकांच्या मनाची व हृदयाची एकी हवी असते.'

श्रीमती इंदिरा गांधीच्या 'मते राष्ट्रीय एकात्मतेची गरज ही केवळ नैतिक हेतूसाठी नाही तर ती एक व्यावहारिक गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता कायम टिकविणे यासाठी केवळ सरकारी पातळीवरून प्रयत्न करून भागणार नाही. त्यासाठी विद्यार्थी, लेखक कलावत, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय पक्ष, विविध सांस्कृतिक व अन्य संस्था, जनसंपर्काची विविध माध्यम या सर्वांनी प्रयत्न केले पाहि-जेत. यासाठी पुरेशी यंत्रणा उभारली पाहिजे व सामाजिक व राजकीय जीवन नेस्तनाबूत करणाऱ्या दुष्ट शक्तीविरुद्ध मुकाबला केला पाहिजे.'

डॉ राधाकृष्णन यांच्या मते 'राष्ट्रीय एकात्मता साधण्या-साठी भूगोल, इतिहास, सामाजिक वारसा व आर्थिक ध्येय यांची गरज असते. आपल्या देशाची सुरक्षितता फक्त आपल्या औद्योगिक कृषिविषयक व वैज्ञानिक शक्तीवरच अवलंबून असते असे नाही तर त्यासाठी आपली सामाजिक संलग्नता व ऐक्य भावना भावनिक प्रेरणा व वृत्ती यांचा विकास व्हायला हवा.'

नागरिकत्व संपूर्ण भारतीय राष्ट्राचेच !

भारताचे संविधान बनविताना आपल्या प्रास्ताविकेत असा संकल्प जाहीर केला की, 'आम्ही भारताचे लोक भारताचे एक


सार्वभौम धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य स्थापित करीत आहोत. ज्यात सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासणा यांचे स्वातंत्र्य व अन्य समसमान अधिकार प्राप्त होऊन व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता वाढीस लागेल.' याच भावनेतून आपण इंडिया अर्थात भारत हा राज्याचा संघ असेल. ही भूमिका स्वीकारली. नागरिक भक्त भारतीयच असेल. हेही घोषित केले. अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरिकत्व कल्पना आपण स्वीकारलेली नाही. व्यक्ती कुठल्याही जातीत जन्मलेली असेल, प्रांताची रहिवासी असेल, विशिष्ट धर्म पाळणारी असेल. परंतु नागरिक मात्र भारतीयच राहील. नागरिकत्व अखिल भारतीय, म्हणजे संपूर्ण भारतीय राष्ट्राचेच मानले जाईल, अशी शास्त्रशुद्ध व उदात्त भूमिका भारतीय संविधानाने स्वीकारलेली आहे.

आपण प्रथम भारतीय व नंतरही भारतीयच !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मते आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू– मुसलमान, सिंधी वा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमतः भारतीय व नंतरही भारतीयच आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे हा आदर्श दृष्टीसमोर ठेवायचा असेल तर ज्यामुळे संकुचित प्रांताभिमानाची व पक्षाभिमानाची वाढ होईल अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.'

महात्मा गांधीनी आणखी एके ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेबद्दल विचार प्रगट करताना म्हणतात की, 'एकच समान ध्येय, समान कार्यक्रम आणि समान दुःख असणे याला मी आमचे राष्ट्रीय एक्य मानतो' साने गुरुजींनी राष्ट्रीय एकात्मतेची भावना,

देशातील तरुणात रुजविली जावी म्हणून आंतरभारतीचा अभिनव प्रयोग, चळवळ सुरू केली होती तिचे महत्त्व आजही असल्यामुळे ती आजही सुरू आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली 'भारत छोडो' घोषणा देऊन देशातील सर्व तरुणांना वा जनतेला एकत्रित करण्यात आले होते तद्वतच आज स्वातंत्र्य काळात, 'भारत जोडो' ही घोषणा, हे विचार घेऊन सर्व देश, सर्व समाज एकत्र जोडला पाहिजे राष्ट्रीय व सामाजिक जीवनाचे तुटणारे दुवे साधण्याचे महान कार्य आज तरुणांनी केले पाहिजे. भारतीय संघराज्य, भारतीय लोकराज्य, चिरायू करण्यासाठी, विकसित करण्यासाठी एकसंघ समाजाची बांधणी आवश्यक आहे. 'एक राष्ट्र एक प्राण हा विचार नव्या पिढीत रुजविला पाहिजे. आजची आमच्या देशाची राजकाय, सामाजिक परिस्थिती जर पाहिली तर राष्ट्रीय ऐक्याची, मानवी मूल्यांची जपणूक व त्याचे संरक्षण करणे, संवर्धन करणे, हे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य होय, हा विचार तरुणांनी सुशिक्षितांनी समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचवावा आणि हा देश बलशाली करावा. एकसंघ समाज व राष्ट्र बांधणीच्या ऐतिहासिक कार्यात स्वतःला झोकून द्यावे. यातच सर्वांचे हित आहे. कल्याण आहे.



लेकुरे उदंड जाहली : लोकसंख्या वाढीचा प्रश्न

एक हातो एक कटी । एक पाठी एक पोटी ॥
संसारामध्ये झाली दाटी । काय करावे सूचेना ॥
लेकुरे उदंड झाली : लक्ष्मी निघोनी गेली ॥
बापुडे भिकेस जागली । अन्न खाया मिळेना ॥

समर्थ रामदासांच्या या काव्यपंक्तीत कुटुंब नियोजन कां आवश्यक आहे हे अगदी साध्या शब्दात सांगितलेले आहे. कुटंब कल्याणाचा संदेश आमच्या देशवासीयांनी समजून घेतला तरच वर्तमान व भावी पिढीला चांगले दिवस येतील, नाही तर वर्षानुवर्षे सतत भरमसाट वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे माणसांची मने व पोटे मारली जाऊन आपले जीवन निकृष्ट व अत्यंत हलाखीचे झाल्याशिवाय राहाणार नाही.

तीन सेकंदास दोन मुले

भारताची लोकसंख्या सध्या प्रत्येकी वर्षी २.५ टक्के वाढते आहे. कांही तज्ज्ञांच्या मते ती याहून अधिक म्हणजे सुमारे ३ टक्क्यांनी वाढते. या गतीने लोकसंख्या वाढत गेली तर १५ वर्षात ती सहज दुप्पट होईल. सध्या तीन सेकंदात दोन मुले याप्रमाणे रोज ५५००० मुले जन्मास येतात. या हिशोबाने शतकाच्या शेवटी म्हणजे १९९९ मध्ये भारताची लोकसंख्या १०० कोटी होईल असा अंदाज करता येतो.

भारताची पहिली जनगणना १८७१ साली झाली. त्यावेळी देशातील लोकसंख्या २५.४ कोटी होती. १९७१ च्या जनगणनेत ती ५४.८ कोटी असल्याचे दिसून आले. १८७१ ते १९२१ पर्यंत

वाढीचा हा वेग अतिशय मंद होता. १९२१ ते १९७१ या अर्ध्या शतकात २५ कोटीवरून ५५ कोटीवर गेली. १९६१ ते १९७१ या दहा वर्षात ही लोकसंख्या १०.९ कोटींनी वाढली, आज ६५ कोटी ८० लक्ष जनसंख्या असून ती दरमहा दहा लाखांनी वाढते आहे. पुढील तक्ताच पहा.

वर्ष	संख्या (कोटी)	वाढीचे शेकडा प्रमाण
१८९१	२३.५८	५ ते ७
१९३१	२७.७	१२.०
१९५१	४१.०	२१.६
१९७१	५५.०	२४.०
१९८१	६८.५	२५.१

भारत/लोकसंख्या तक्ता

१)	लोकसंख्या संदर्भ दिवस		१ एप्रिल १९७१
			१ मार्च १९८१
२)	जिल्ह्यांची संख्या		१९७१ – ३६०
			१९८१ – ४१२
३)	क्षेत्रफळ		१९८१ – ३२८१२६३ कि. मी.
	सर्वात मोठे क्षेत्रफळ मध्यप्रदेश		४४३४४६ कि. मी. चौ.
	लक्षद्विप		३२ कि. मी. चौ.
४)	लोकसंख्या	एकूण	पुरुष स्त्री
	१९७१	५४८१५९६५२	२८४०४९२७६ २६४११०३७६
	१९८१	६८५१८४६९२	३५४३९७८८४ ३३०७८६८०६
	सर्वात जास्त उत्तर प्रदेश		११०८६२०१३
	सर्वात कमी लक्षद्विप		४०२४९
५)	लोकसंख्येचे वाढते प्रमाण		१९६१-७१-२४.८० टक्के
			१९७१-८१-२५.००

६) जनसंख्येचे प्रमाण १९८१– प्रत्येक चौ. कि. मी. २१६

		एकूण	पुरुष	स्त्री
७) साक्षरतेचे प्रमाण	१९७१	२९.४८ टक्के	३९.५२	१८.७०
	१९८१	३६.२३ ,,	४६.४९	२४.८२

८) स्त्री–पुरुष प्रमाण १९७१–९३१
प्रत्येक हजारी पुरुषास १९८१–९३४

९) काम करणारे मनुष्यबळ १९७१–३३.६ टक्के
१९८१–३३.४५ ,,

१०) शेतीवर आधारित १९७१–६९.७७ ,,
शेतात काम करणारी संख्या १९८१–६६.५२ ,,

प्रत्येक चौ. किलोमीटरला जनसंख्येचे वाढते प्रमाण दाखविणारा तक्ता.

१९०१–७७	
१९११–८२	१९५१–११७
१९२१–८१	१९६१–१४२
१९३१–९०	१९७१–१७७
१९४१–१०३	१९८१–२१६

प्रत्येक दशकात स्त्री–पुरुषांचे प्रमाण–पुरुष १००० हजार असतील तेव्हा स्त्रियांचे प्रमाण दर्शविणारा तक्ता.

१९०१	९७२	१९५१	९४८
१९११	९६४	१९६१	९४३
१९२१	९५६	१९७१	९३१
१९३१	९५२	१९८१	९३४
१९४१	९४७		

वरील तक्त्यावरून स्त्रियांचे घटते प्रमाण चिंताजनक आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार, अन्याय आणि हुंडापद्धती, हुंडाबळी वगैरेमुळे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. अलीकडे मुलगी जन्मली की आईबाप काळजीत पडतात. मुलींची

परदेशात विक्री आदी तेव्हा ही एक नवी समस्या आज फार जाणवत नसली तरी जर पुढे हे प्रमाण घटतच चालले तर नवे सामाजिक प्रश्न निर्माण होतील.

२०व्या शतकात जगातील खंडाप्रमाणे लोकसंख्या दर्शकतक्ता

(आकडे दशलक्षामध्ये)

वर्ष	युरोप	आशिया	अमेरिका	आफ्रिका	ओनिया	जागतिस्तर
१९००	४०१	९३७	१४४	१२०	६	१,६०८
१९२०	३२५	१०२३	२०६	१४३	८.५	१.८६६१
१९३०	३५५	११२०	२४२	१६४	१०	२,०७०
१९४०	३८०	१२४४	२७४	१९१	११.१	२२९५
१९५०	३९२	१३५५	३२८	२१७	१२ ६	२४८६
१९६०	४२५	१६४५	४१२	२७०	१५.८	२९८२
१९७०	४६२	२०५६	५११	३४४	१५.४	३६३२
१९७१	४६६	२१०४	५२२	३१४	१९ ८	३७०६

जगातील लोकसंख्येशी खंडवार लोकसंख्येचे बदलते प्रमाण

खंड	१९२०	१९५०	१९६०	१९७०	१९७१
युरोप	१७.५	१५.८	१४.३	१२.७	१२.६
आशिया	५५	५४.५	५५.२	५६.६	५६.८
अमेरिका	११.१	१३.२	१३.८	१४.१	१४.१
आफ्रिका	७.७	८.७	९.१	९.५	९.६

वरील दोन्ही तक्त्यावरून आपणास हे स्पष्ट दिसून येते की, लोकसंख्या वाढीचा दर हा गरीब, मागासलेल्या देशात वाढता आहे. तर विकसित, श्रीमंत जगतात, देशात लोकसंख्या वाढीचा दर घसरता आहे. कमी कमी होत चाललेला दिसून येतो. आशिया, आफ्रिका खंडातील लोकसंख्या विस्ताराचे हे स्वरूप स्पष्ट जाणवते.

म्हणून मागासलेल्या देशांनी ही बाब लक्षात घेऊन आपल्या सर्वांगीण विकासाच्या योजना द्रुतगतीने कराव्यात, राहणीमानाचा दर्जा उंचवावा, शिक्षणाचे प्रमाण वाढवावे, रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, प्रसार माध्यमाद्वारे व कुटंबनियोजनाच्या सर्व अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यास जनतेला प्रवृत्त करावे तरच या वाढत्या लोकसंख्येला आळा बसू शकेल. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे या विकसनशील देशापुढे अनेक प्रश्न निर्माण होतात. होणारा सर्व विकास ही वाढती लोकसंख्याच खाऊन टाकते व झालेला विकासही लक्षात येत नाही, म्हणून वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सर्वापुढेच आहे. आपल्या देशापुढे तर ही गंभीर समस्या आहे.

अशा या अफाट व अनिर्बंध प्रमाणात वाढणाऱ्या लोकसंख्येने गेल्या ३८ वर्षांत विविध क्षेत्रात झालेला विकास जणू खाऊन टाकला असून आपणास आजही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक प्रश्न भेडसावीत आहेत.

वाढीची प्रमुख कारणे

आपल्या देशातील लोकसंख्या इतक्या वेगाने का वाढत आहे याचा शोध घेतल्यास अनेक कारणे आपल्या समाजव्यवस्थेत, आपल्या समाज जीवनात दिसून येतील.

राजकीय स्थैर्य

इंग्रजी राजवटीमुळे भारतात राजकीय स्थैर्य प्राप्त झाले. त्यामुळे वारंवार होणारी युद्धे, परस्परातील हेवेदावे यामुळे होणारी संहार कमी झाला. यामुळे जीवन स्थिर आणि सुखावह झाले आणि त्याचा परिणाम लोकसंख्येच्या वृद्धीत झाला.

वैद्यकीय सोयी

अनेक रोगांवर उपाय योजण्यात आज विज्ञान यशस्वी झाले आहे. पूर्वी रोगाची एक साथ आली म्हणजे हजारे लोक मृत्युमुखी पडत आणि एक दोन पिढ्या रोगाने जर्जर होत. पण आज तसे नाही. यामुळे आयुर्मानही वाढते. माणूस सशक्त झाला. म्हणजे

प्रजोत्पादन आणि जीवन मर्यादित वाढल्यामुळे एकूण लोकसंख्या वाढली.

धार्मिक चालीरीती

भारतातील जुन्या अंधश्रद्धा स्त्री लवकर लग्न करण्याची पद्धत, बालविवाह; बहुपत्नीत्वाची पद्धत; धर्मभोळेपणा, एकत्र कुटुंबपद्धती, विधवाविवाह, कुटुंबनियोजनास विरोध, मुलगाच हवा म्हणून होणारी प्रजोत्पादनातील वाढ अशा कितीतरी गोष्टीमुळे जनसंख्या वाढण्यास मदत होते. मुस्लिमांना वेगळे कायदे यामुळेही जनसंख्या वाढते.

भारतात स्त्रियांचा दर्जा कमी आहे. स्त्री ही पुरुषासाठीच असून ती त्याच्या उपभोगासाठी आहे, आजही त्यात फारसा बदल पडलेला दिसत नाही आणि म्हणून मुले होण्याने प्रकृतीवर परिणाम होतो हे अनुभवलेले असताही पुरुषाच्या संमतीशिवाय शस्त्रक्रिया करून घेणे महिलांना शक्य होत नाही.

जन्म–मृत्यू प्रमाणातील बदल :

वर्ष	दर हजारी जनन	दर हजारी मृत्यू	निव्वळ वाढ
	(दर हजारी)		
१९११	४७	४६	१
१९५१	४०	२७	१३
१९६१	४१	२३	१८
१९७१	३९	१४	२५
१९७५	३५	११.३	२१.९
१९८१	३४	१३	२१.०

कुटुंब नियोजन हा काही वादाचा विषय नव्हे, ते सक्तीने करावे की लोकांना त्याचे महत्त्व पटवून देऊन साध्य करावे एवढाच प्रश्न.

इतर देशांशी तुलना :

देश	जनन	मृत्यू	निव्वळ वाढ
	(दर हजारी)		
भारत	४१	२१	२०
अमेरिका	३०	१६	१४
इंग्लंड	२०	१२	८
फ्रान्स	१८	१६	२

सरासरी आयुर्मान :

भारत	सन	वर्षे
	१९२१	२१
	१९५१	३२
	१९६१	४२.४
	१९७२	५२
	१९८१	५६

हा प्रश्न सर्वांनीच समजून घेतला पाहिजे

अशा प्रकारे आपल्या देशातील लोकसंख्या अफाट प्रमाणात वाढते आहे उपलब्ध होणाऱ्या सोयी आणि सवलतीमुळे तिच्यात गुणात्मक वाढ होत आहे. म्हणजे ही वाढ संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही दृष्टीने होत आहे. इतर कोणत्याही क्षेत्रात असा क्रम असेल. अशा या वाढत्या लोकसंख्येचा राष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनावर गंभीर परिणाम होतो आणि म्हणून मूलगामी परिणामकारक योजना अंमलात आणली पाहिजे.

आज आपल्या देशाची लोकसंख्या वाढती आहे. हा वाढता क्रम आपणास अनिष्ट आहे, धोकादायक आहे. हे जवळपास सर्वांना समजलेले आहे. शासनानेही पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून यावर उपाय सुचवून नियंत्रणवाढी कामाला लागेल. तेव्हा अशी वाढती

लोकसंख्या सामाजिक आणि आर्थिक जीवनावर कसा परिणाम घडवून आणते याचा अभ्यास, माहिती सर्वांनाच कळावयास हवी. ही अनिष्ठता सर्वांच्या लक्षात आली म्हणजे सर्वजनच जनसंख्येच्या नियंत्रणासाठी स्वतः होऊनच कामाला लागतील अशी अपेक्षा. नव्हे तर ते यासाठी झटले तरच आपणास सुखद भविष्य आहे.

सामाजिक जीवनावर परिणाम

वाढत्या लोकसंख्येचे सामाजिक जीवानवर अनिष्ट परिणाम होतो तो असा, पोटाला अन्न, अंगभर कपडा, राहण्यासाठी निवारा या गरजाही उपलब्ध होणे अवघड झाले आहे. आपण मिश्र अर्थ-व्यवस्था पत्करली आहे. या व्यवस्थेत वन्याचदा भांडवलदारी वृत्तीच्या लोकांचे फावते. वाढत्या लोकसंख्येमुळे कमी मजुरीवर अधिक मजूर सहज मिळतात. यामुळे कामगारांना, मजुरांना, शेतमजुरांना अथवा अत्यंत लहान प्रतीच्या व्यावसायिकांना अत्यंत कमी मजुरी मिळते. त्यांचे जीवनमान कधीच उंचावत नाही.

त्या लोकांना असे काम मिळत नाही ते लोक, तरूण वर्ग बेकार राहिल्याने वाईट मार्गांकडे जातो. इतर कोणताही आक्रोश थांबवू शकेल पण पोटाचा आक्रोश कधीच थांबत नाही. म. गांधीनी म्हटले आहे की, 'अर्ध्या भाकरीसाठी हे लोक देशालाही विकतील,' त्यांचे विचार सार्थ वाटतात. अफाट लोकसख्येमुळे सरकारही हतबल होते. यंत्रणा, संसाधने अपुरी पडतात. परिणामी गुन्हेगारी, भ्रष्टा-चार, रोग, बेकारी, उपासमार, अनैतिकता, पिळवणूक, अज्ञान अशा अनेक कुप्रवृत्ती होवून सामाजिक जीवन अस्थिर, गढूळ आणि भयभीत होते. लोकसंख्या मर्यादित असेल तर प्रत्येकाला काम मिळेल. पर्यायाने त्यांचे उत्पन्न वाढल्यामुळे वरील सारख्या सामाजिक विकृती निर्माण होणार नाहीत. सामाजिक वातावरण शांत होण्यासाठी स्थिर, पुरोगामी समृद्ध, सुखी समाजव्यवस्था राहाण्यासाठी अमर्याद लोकसख्या हा मोठा अडसर आहे. तो दूर केला तरच योग्य वातावरण निर्माण होईल. समाज सशक्त होईल आणि प्रगतीपथावर राहील. उदा. अमेरिका, इंग्लंड, जपान, रशिया.

आर्थिक जीवनावरील परिणाम ।

अर्थकारण हे सर्व गोष्टींच्या मुळाशी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये. राष्ट्राच्या राजकीय परिस्थिती कितीही एकसंघ असूद्यात, एखाद्या राष्ट्राची सांस्कृतिक, शैक्षणिक धोरणे कितीही पुरोगामी असू द्यात, जोपर्यंत त्या राष्ट्राच्या आर्थिक स्थिती सुधारणार नाही. नव्हे जोपर्यंत त्या राष्ट्राच्या पुरोगामीत्वाच्या आर्थिक गरजा पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत तिथे स्थिर शासन, एकसंघ समाज, पुरोगामी विचार स्थिर राहणार नाहीत. म्हणून अर्थ हा सर्व प्रकारच्या आर्थिक समस्यांवर तोडगा आहे. आमच्या देशात स्वातंत्र्यानंतर आर्थिक क्षेत्राच्या विकासासाठी शासनाकडून सतत प्रयत्न झाले. स्वातंत्र्यापूर्वी टाचणी देखील आयात करणारा भारत आज रणगाडे, विमाने जहाजे, घडयाळे, रेल्वे डबे, व रासायनिक साहित्य, लोखड, सिमेंट, खते, कपडे, साखर, फळफळावळ, तंत्रज्ञ आदी निर्यात करणारा बनला आहे. जागतिक बाजारपेठेत मानाचे स्थान मिळवून बसला आहे शिवाय हे करीत असतांना अनेक मानवनिर्मित व नैसर्गिक सकटाशी मुकाबलाही जबरदस्तपणे करून (युद्धे, वादळे, पूर, दुष्काळ) एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून स्वाभिमानाने स्वयंपूर्णतेच्या वाटचालीवर आहे. खरे म्हणजे केवळ ३७ वर्षात आणि प्रतिकूल परिस्थितीत इतकी प्रचंड प्रगती ही आर्थिक विकासाच्या नियोजनाचा विजयच म्हटला पाहिजे.

पण दूर्दैवाने इतकी प्रगती करूनही आम्ही देशातील जनतेला सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसुविधा, किमान गरजांची पूर्तता करू शकत नाही. याचे प्रमुख कारण आमची वाढती लोकसंख्या; या अफाट, बेफामपण वाढणाऱ्या जनसंख्यमुळे आमच्या सरासरी दर डोई उत्पन्नातही फारशी वाढ होत नाही.

काही ठळक परिणाम :

१) भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न खूप वाढूनही दर डोई उत्पन्नात फारशी वाढ नाही.

२) अन्नधान्य उत्पादन दुप्पटीने वाढले पण दर डोई अन्नधान्य पूर्वी इतकेच.

१९५१ १४ औंस

१९७१ १५ १।२ औंस

३) शेतजमीनींचे दर डोई (उत्पन्न) प्रमाण घटले.

४) देशात उद्योगधंदे वाढले, पण बेकारी घटली नाही. जवळ जवळ २–३ कोटी बेकार आहेत.

५) उत्पादक उपभोक्त्यांपेक्षा अनुत्पादक उपभोक्त्यांचे प्रमाण अधिक आहे. आज एक काम करतो व तीन बसून खातात अशी परिस्थिती आहे.

६) वाढत्या लोकसंख्येमुळे भांडवल निर्मितीत अडचणी लोकसंख्या प्रतिवर्षी २.५ टक्के वाढते बचत प्रतिवर्षी १.२ टक्के वाढते.

७) वाढत्या जनसंख्येमुळे शिक्षण, वैद्यकीय, सोयी, घर-बांधणी आदीवर अफाट खर्च प्रत्येक पदवीधर विद्यार्थ्यामागे वीस हजार रु. खर्च आणि डॉक्टर, इंजिनिअरसाठी एक लाख रु. खर्च.

८) वाढत्या लोकसंख्येमुळे कार्यक्षमता घटते.

९) श्रमाची हानी. प्रत्येक वर्षी भारतात १ कोटी २५ लक्ष स्त्रिया प्रसूत होतात. म्हणजे त्यांचे बाळंतपणाआधी दोन महिने व नंतर दोन महिने असे वाया जातात.

अशा प्रकारे अनेकविध परिणाम आर्थिक जीवनावर होत असल्यामुळे वैफल्य, निकृष्ट अशा भयानक परिस्थितीस माणसाला दिवस कंठावे लागतात. मग वाटते आपण या जीवनात आलो कशाला ? नको ते जीवन ?

या बिकट अवस्थेवर केवळ लोकसंख्या नियंत्रण हाच एक उपाय आहे, असे नसले तरी तो प्रथम क्रमांकाचा उपाय आहे. लोकसंख्येला वेळीच आटोक्यात आणले तरी त्याचे स्वरूप सौम्य होईल, नव्हे तर खरेच निवळेल.

कुटुंब नियोजन आवश्यक :

कुटुंब नियोजनामुळे केवळ लोकसंख्या वाढीची गतीच कमी होत नाही तर गुणवत्ताही सुधारते. पहिल्या योजनेत केवळ १५ कोटी रुपये यासाठीच मंजुर केले गेले तर पाचव्या योजनेत ५१४ कोटी रु. या लोकसंख्या नियंत्रणासाठी खर्चण्यात आले. कुटुंबनियोजनाचा प्रभाव केवळ शहरात सुशिक्षित जनतेत होत आहे पण बहुतांश जनता (७० टक्के) खेड्यात रहात असल्यामुळे प्रथम खड्यात कुटुंब नियोजन यशस्वी केले पाहिजे. सर्व धर्मियांना समान कायदा, साक्षरतेचा प्रसार, विवाह कायद्यात सुधारणा बालविवाहास बंदी, प्राचीन कुटुंब कल्याणाचे नियमांचे (ब्रह्मचर्य, संयम) पुनरुज्जीवन करणे अशा विविध मार्गांचा अवलंब करावा. तसेच आजारी, वेडे भिकारी, रोगी, गुन्हेगार याचे परदेशातल्याप्रमाणे खच्चीकरण करावे असेही कांही अर्थतज्ञ सुचवितात.

व्यावहारिक उद्दिष्टे आखावी :

लोकांचा आर्थिक नियोजनावर विश्वास टिकावयाचा असेल तर महत्वाकांक्षी उद्दिष्टापेक्षा व्यावहारिक व शक्य उद्दिष्टे लोकासमोर ठेऊन ती पूर्ण करणं अधिक उपयुक्त व राजकीय शहाणपणाचे आहे. राजकीय स्वार्थासाठी लोकसंख्येच्या भयानक प्रश्नाकडे भावनात्मक होऊन संकट ओढऊन घेऊ नये हा प्रश्न धार्मिक बनवू नये.

एकंदरीत पाहाता अन्नधान्याचा पुरेसा साठा (२ कोटी टन धान्य). परकीय चलन साठ्याचा पुरेसा आधार (५००० कोटी रु व मासिक १५० कोटीची वाढ), औद्योगिक विकासासाठी आवश्यक ती पायाभूत तयारी, तांत्रिक क्षेत्रात उपलब्ध असणारे दर्जेदार मनुष्यबळ व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी जागृत असणारा समाज व मोठ्या बदलासाठी आवश्यक असणारा राजकीय बदल, जागृती हे सर्व उपकार व उपयुक्त घटक असल्यामुळे नवीन शासनाने देशातील तज्ञाच्या मदतीने सुसूत्र व परिस्थितीशी सुसंगत असे स्थिर धारण आखणे आज अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा

अफाट, अनिर्बंध वाढणारी लोकसंख्याही कायमची डोकेदुखी होऊन आपल्या सर्व देशात ल विकास तील मोठी अडसर ठरणार आहे.

अग्रक्रम देऊन हा प्रश्न सोडवावा :

आज आपल्या देशात वारवार निर्माण होणारे सामाजिक आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आदि क्षेत्रातील प्रश्न निर्माण करण्यात वाढती लोकसंख्या कायमचे आणि प्रमुख कारण आहे. म्हणून सर्वांनाच चिंतेचा आणि डोकेदुखीचा हा प्रश्न प्रथम प्राधान्य देऊन राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून सोडवला पाहिजे, तरच देशात सुख, शांतता आणि समृद्धी नांदेल.

आफ्रिकेतील देश : युगांडा
इदीअमीनच्या जुलूमशाहीचा अंत

युगांडा द. आफ्रिकेतील पूर्व किनाऱ्यालगत निसर्ग सौन्दर्याने बहरलेले लहानसे राष्ट्र आहे. लोकसंख्या केवळ १ कोटी २० लाखांच्या जवळपास त्यात ७५ लाख ख्रिश्चन आहेत. बाकीचे मुस्लिम आणि इतर देशातील रहिवाशी. ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीतून यांची मुक्तता १९६२ साली झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर युगांडाचे राजे काबाका उर्फ दुसरे एडवर्ड मुरेसा अध्यक्ष झाले आणि पंतप्रधानपदी ओबेट यांची वर्णी लागली. पण महत्वाकांक्षी ओबेटनेही राजवट इदी अमीन यांच्या मदतीने १९६६ साली काबाका ना पदच्युत करून युगांडाची सर्व सूत्रे स्वतःच्या हाती घेतली काबाकाच्या अनुयायांना दडपून टाकण्यात ओबेटनी आपली शक्ती एकवटली. परिणामी देशात फुटिरता वाढली. याचा फायदा घेऊन १९७१ मध्ये राज्यक्रांती होऊन लष्कराच्या बळावर इदी अमीन यांनी सरकार ताब्यात घेतले.

धूर्त अमीन

सत्ता हाती घेतल्यानंतर लवकरच खुल्या निवडणुका घेऊ असे अमीनने जाहीर केले. पण त्याच्या धूर्तपणाला ओबेटनी ओळखले होते. धूर्तपणामुळ ते या सापळ्यात सापडले नाहीत काबाकाचे इंग्लंडमधील प्रेत युगांडात आणून त्याचे सन्मानपूर्वक दफन केले. त्यामुळे राजे काबाकाच्या अनुयायांचा आणि बगांड लोकांचा त्यास पाठिंबा मिळाला. पण देशाचा प्रमुख झाल्यामुळ देशापुढील असंख्य प्रश्न कसे सोडवावयाचे हा प्रश्न आता महत्वाचा होता.

आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची होती, देशात अस्थिरता होती. तशात राजकारणाचे जुजबी ज्ञान असलेल्या योगायोगाने सत्ताधीश बनलेल्या अमीनपुढे फार मोठे कोडे होते. अशा स्थितीत अमीनने आपल्या अडाणीपणाच्या पण चंचल, क्रूर आणि विक्षिप्त राजवटीस सुरूवात केली. १९७१ ते १९७९ या आठ वर्षांच्या कालावधीत त्यांची एकंदर हुकूमशाही राजवट म्हणजे एखाद्या रानटी अवस्थेतील, निसर्ग अवस्थेतील टोळीच्या प्रमुखासारखीच होती असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

जुलूमशाहीचे कारनामे

देशाच्या आर्थिक बंडाळीवरून लोकांचे लक्ष वळविण्यासाठी १९७२ च्या सुरवातीस ८९ हजार आशियायींना रातोरात नेसत्या वस्त्रानिशी देशाबाहेर काढण्याचे कर्मकांड या लहरी क्रूर जुलूमशहाने केले या आशियायी लोकात मुख्यत्वे भारतीय आणि पाकिस्तानी लोक होते. हे सर्व लहान-मोठे व्यापारी होते. या परदेशीय लोकांना हुसकावून लावल्यामुळे आर्थिक संकट दूर होण्याऐवजी अडचणी निर्माण झाल्या. व्यापार, लहान मोठ कारखाने बंद पडले. कॉफी कापूस, केळी, दारू याची निर्यात बंद पडली हे सर्व उद्योगधंदे मोडकळीस आले कारण या सर्व धंद्याचे ज्ञान परकीयांनाच अधिक होते. त्याच लोकांची हकालपट्टी केल्यामुळे हे उद्योग कोण पाहणार ? स्थानिक लोक हे कारखाने चालवण्यास असमर्थ होते.

हिटलरचा गौरव –

सत्ता प्राप्तीनंतर आपण युगांडाचे आजन्म (तहहयात) अध्यक्ष आहोत, बड दादा आहोत, फिल्ड मार्शल आहोत असे तो सांगत असे. त्याची वागणूक दिवसेंदिवस माणूसकीला काळीमा फासणारी राक्षसी प्रवृत्तीची बनत चालली होती. हिटलरचा गौरव करून युगांडाच्या राजधानीच्या शहरात त्याचे भव्य स्मारक करण्याचेही त्याने जाहीर केले होते. समारंभाच्या ठिकाणी ब्रिटीश

व्यापाऱ्यांना त्यांची खुर्ची खांद्यावर उचलून आणावयास लावले होते. हे कृत्य म्हणजे गोऱ्यांना अपमानित करण्यासाठ च तो करीत असे व तशी कबूलीही स्वतः देत असे. गेल्या सात आठ वर्षाच्या कालखंडात या कपटी, संशयी हुकुमशहाने तीन लाख लोकांना ठार केले आहे. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संस्थेने इदी अमीनवर हा आरोप करून म्हटले आहे की, 'हा जुलमशहा आपल्या विरोधकांची अशा क्रुरपणे हत्या करावयाचा की, त्याची कल्पनाही करवत नाही.' ओबेंटेचे उच्चाटन तरी तो समाधानी नव्हता. त्यांच्या जातीच्या लोकांना तो शत्रू समजून ठार करीत असे. युगांडा लष्कराचा प्रमुख ब्रिगेडीअर सुलेमान हुसेन यास संशयावरून तो जेवत असतांनाच या सैतानाने गोळचा झाडल्या.

रक्त पिणारा –

माणसाचे रक्त पिणारा आणि मांसही खाणारा हा आधुनिक युगातील राक्षसच म्हणावा लागेल. मार्च १९७४ मध्ये कटाच्या आरोपावरून चार्लस अरबेचा (चीफ ऑफ स्टाफ ब्रिगेडिअर) खुन केला आणि त्याचे रक्तही पिले. ऑगस्ट १९७५ मध्यें अमीनने आपल्या मंत्रीमंडळासमोर आपण नरभक्षक असल्याची कबुली दिलेली आहे. अमिनच्या मंत्रीमंडळातील एक सदस्य श्री. हेन्री किम्बां यांनी आपल्या 'स्टेट ऑफ ब्लड' या ग्रंथात या संदर्भात दुजोरा दिला आहे. म्हणजे अमिन हा मानवाचे रक्त व मांस खाणारा होता याबद्दल पुरावे मिळतात.

कौटुंबिक जीवन

राजकारणात जसा हा सत्तापिपासू, क्रूर, निर्दयी आहे. तसेच त्याचे कौटुंबिक जीवनही बरेच चमत्कारीक आहे. अमीनला पाच लग्नाच्या बायका होत्या. केवळ लग्नांच्या बायकापासून त्याला ३४ पेक्षा जास्त मुले आहेत. यावरून त्याची लैंगिक जीवनाची राक्षसीप्रवृत्ती दिसून येते. या सर्व कुटुंबियांना विलासी, चैनिचे जीवन जगण्यासाठी अमीनने राष्ट्राची अमाप लूट केली. युगांडा एअर

लाइन्सची विमाने अमीनला आणि सैन्य अधिकाऱ्यांना इग्लँडहून चैनीच्या, उपभोगाच्या वस्तू आणण्यासाठी उड्डाण करीत, यामुळे देशाचे दिवाळेच निघे. अन्न व दारू करण्यासाठी भरपूर केळं चे पीक निघते. टैपिओका व चाम या पिकामुळेही अन्न मिळते इथे अन्नाची टंचाई नाही पण ज्या इतर वस्तू लागतात, उदा. कपडा, औषधे इत्यादी या कशा मिळणार? निर्यात शून्य आहे म्हणून युगांडातील-सामान्य जनतेचे जीवन अतिशय हलाखीचे, त्रासाचे, भीतीचे आहे. इदी अमीनचे लोक केव्हा येतील आणि आपणास ठार मारतील याचा काहीच नेम नाही. अत्यंत असुरक्षित जीवन म्हणजे युगांडा-तील सामान्यजनतेचे सांगता यईल. अशा या कर्दनकाळाचा अंत केव्हा आणि कधी होणार हा प्रश्न युगांडातील अशिक्षित, अडाणी जनतेपुढे होता.

कमालीची अशिक्षितता

अफ्रिका खंड पूर्वीपासूनच अर्वाचीन जगापासून दूर आहे. त्यात युरोपीयनांनी शकडो वर्षे तिथ वसाहती निर्माण केल्या आणि पिळवणूक केली. गल्या १०-१५ वर्षांत तेथील राष्ट्रे स्वतंत्र झालेली आहेत. त्यातीलच युगांडा हे लहानसे अभयारण्य, निसर्ग सौन्दर्याने नटलेले राष्ट्र आहे. विल्सन चर्चिलने युगांडाला आफ्रिकेची माती म्हटलेले आहे. अशा या राष्ट्रात आजही ९५ टक्के लोक अशिक्षित, अडाणी आहेत. त्यातील ५ टक्के लोक शिकलेले, तरी अमीनने निम्यांची कत्तल केली. उरलेले जीव वाचवण्यासाठी पर-देशात पळाले आणि काही जीव वाचविण्यासाठी मान तुकवून स्वस्थ बसले, अशा या अडाणी लोकांचा राजा इदी अमिन. विरोध करा-यला कोणीही तयार नाही. कारण विरोध म्हणजे मृत्यु हे ठरलेले होते

चैनीच्या वस्तुवर भर -

इदि यमिनच्या काळात ट्रक्स, मोटारी या सारख्या वाह-नांची गरज नसतांना हजारोंच्या सख्येने आयात केले. टेलिव्हिजन-ची सोय केली पण सर्व सामान्य जनतेला लागणारे साहित्य महाग

देण्यात येवू लागले. ३ डॉलरला साबण, ५५ डॉलरला पँट, ११८ डॉलरला चादरी–ब्लँकेटस् इतक्या महागात वस्तू मिळत. सर्व सामान्याचे उत्पन्न मात्र अवघे ८०० डॉलर ते १ हजार डॉलर होते. यामुळे जनता त्रस्त झाली होती. दारू, चैनीच्या वस्तुची चंगळ होती, म्हणून १९७७ नंतर अमिन विरोधकांनी एकत्र येऊन 'युगांडा नॅशनल मूव्हमेंट' ने जोरदार उठाव केला. १९७२ मध्ये ओबेटेनी टांझानिया मधून मदत घेऊन प्रयत्न करून पाहिला होता पण अपयश आले होते. अमिनने सुदान व झेरे मधून भाडोत्री सैन्य आणून आपल्या अंतर्गत व वहिर्गत शत्रुला थोपविण्याचे सुरु कार्य केले होते पण स्वदेशी सैन्यापेक्षा भाडोत्री सैन्यावर मोठा खर्च वाढला. त्यातुनही असंतोष निर्माण झाला. देशातील असंतोष लपविण्यासाठी शेजारी राष्ट्रावर हल्ला करुन, युद्ध करून राजवट टिकविण्याचा अमिनचा इरादा होता. त्यासाठी त्यान टांझानियावर हल्ला केला. कारण ज्युलियस न्येरेरे यांनी अमिन विरोधी भूमिका घेतलेली होती. न्यरेरे संदर्भात इदि अमिन वैय्यक्तिक अपमानजनक बोलत असे. 'टांझानिया आणि युगांडा या दोन देशामधला वाद न्येरेरेबरोबर मुष्ठी युद्धाचा एक सामना खेळून त्या सामन्यातील निर्णयानुसार सोडायला आपण तयार आहोत. या मुष्ठीयुद्धाच्या रिंगणात आपण एक हात पाठ ला बांधून आणि एका पायाला जड वजने बांधून उतरायला तयार आहोत. न्येरेरे अशक्य असल्याने त्याला समान संघर्ष उपलब्ध करून देण्यासाठी आपण एक हात आणि एक पाय अशा पद्धतीने त्या लढतीपुरता निकामी करून घ्यायला तयार आहोत' हे अमीनचे जाहिर विधान न्येरेरेला दुखावणारे ठरले. इतकेच नव्हे तर अमिनने न्यूरेरेची चीड काढण्यासाठी असे म्हटले होते की, 'न्येरेरे स्त्री असती तर आपण तिच्याशी लग्न केले असते आणि किमान तिला ५–१० अपत्याची देणगी देऊ केली असती' असे म्हणून त्याने न्येरेरेची टरच उडविली यामुळे न्येरेरे यानी अमीनच्या पदच्युतिसाठी सव ते साहच्य

युगांडा नॅशनल मुव्हमेंटला केले. फेब्रुवारी १९७९ मध्ये युगांडात टांझानियाच्या सैन्याने प्रवेश केला, व ओबेटे आणि इतरांना विजयश्री मिळवून दिली.

अमीनचा अन्त :

अशा या जुलमशहाची राजवट ११ एप्रील १९७९ ला संपली. टांझानियाचे प्रमुख ज्युलियस न्यरेरे याच्या मदतीने युगांडाच्या मुक्ती सैनिकांनी कंपाला ताब्यात घतली. युगांडा नॅशनल लिबरेशनने आर्मीचा लष्करी प्रमुख नेता डेव्हिड ओमिटे ओजोक यांनी पुर्ण युगांडा अमीनच्या तावर्डतून मुक्त झाल्याची घोषणा केली. आज या देशात नवे सरकारही स्थापन झालेले आहे युगांडाचे अध्यक्ष म्हणून युगांडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू युसूफ लुले यांनी 'दार–यप–सलाम' येथे आपल्या मंत्रिमंडळाचा घोषणाही केली. त्यांच्या मंत्रिमंडळात १४ सदस्य होते. युसूफ लुले हे युगांडातील जनतेला अमीनच्या असह्य, जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी भुमिगत प्रयत्न करीत होते. योग्य संधी मिळताच टांझानियाच्या सैनिकांच्या मदतीने त्यांनी अमीनला पळवून लावले. युगांडाची राजधानी कंपाला युगांडा स्वातंत्र्यसैनिकांनी हस्तगत केली पण अमीन अदृश्य राहिला. युसूफ लुले यांनी अमीनला गाठून ठार करण्याचे जनतेला आवाहन केले. जनतेने या नव्या सरकारचे स्वागत केले युगांडात अजून पूर्ण शांतता आहे असे नाही. अमीन सारख्या क्रुर, राक्षसी वृत्तीच्या जूलूम शहाचा शेवट हा अशा प्रकारे झाला. युगांडातील परिवर्तन योग्यच झाले असे म्हणावे लागेल. ब्रिटनने युगांडाच्या नव्या सरकारला मान्यता दिलेली आहे. इतरही राष्ट्रांनी आता युगांडास मान्यता दिलेली आहे. प्रारंभी २१ गटाचे हंगामी

प्रो ल्युले सरकार स्थापन झाले होते. पण आता निवडणुका होऊन डॉ. मिल्टन ओबेटे यांच्या नेतृत्वाखालील सरकार आज कार्यरत आहे आफ्रीका खंडातील आफ्रीका एकता संघात व अलिप्त राष्ट्र गटांच्या संघटनेत तसेच युनो संघटनेत युगांडास प्रवेश मिळाला आहे. गेल्या अनेक वर्षापासून हुकुमशाहीच्या आणि अन्यायाच्या चक्रात सापडलेल्या या राष्ट्रास नवे नेतृत्व व विकासाची दिशा सापडलेली आहे. आज ओबटेचे सरकार कार्य करीत आहे.

आफ्रिकेतील देश : झिबांबे

'राष्ट्रवादाचा विजय व लोकराज्याची स्थापना!'

आफ्रिका खंडाचा संपूर्ण इतिहास म्हणजे पाश्चात्यांच्या जुलूमशाहीचा इतिहास आहे. या विस्तृत आणि नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असलेल्या भूप्रदेशावर गोऱ्यांच्या साम्राज्यशाहीची सुरूवात सोळाव्या शतकापासून झाली. अठराव्या शतकापासून युरोपियन राष्ट्रांना आफ्रिकेतील दहा कोटी कृष्णवर्णीयांना पळवून गुलाम म्हणून परदेशात विकले आणि पुढे १९०० पर्यंत ब्रिटीश, फ्रेंच, पोर्तुगीज, अिटालीयन, जर्मन, डच इत्यादी साम्राज्यवादी सत्तांनी आफ्रिकेतील निरनिराळे प्रदेश जिंकले आणि तेथे स्वतःच्या राजवटी स्थापन करून तेथील राजकीय आणि आर्थिक शोषणाने मूळच्या आफ्रिकन लोकांना दुसरे महायुद्धापर्यंत बाहेरच्या जगापासून मुद्दाम दूर ठेवले. अज्ञान, रोगराई, दारिद्र्य आणि गुलामगिरीचे जीवन हेच या लोकांचे सखे सोबती.

परिवर्तनास प्रारंभ –

शोषणाची ही परिस्थिती १९४५ नंतर एकदम बदलू लागली. आफ्रीकेतील वेगवेगळ्या प्रदेशातील राष्ट्रवादी, स्वातंत्र्यप्रेमी जन आंदोलन दिवसेंदिवस उग्र होत गेली, तशी त्याला आंतरराष्ट्रीय राजनैतिक परिस्थितीही अनुकुल होत गेल्यामुळे युरोपीयांना पिळवणुकीचे हे तंत्र सोडून देणे अपरिहार्य झाले. तरी परंतु तेथील समृद्ध वसाहती सोडण्याचा मोह सुटेना परंतु स्वातंत्र्य चळवळीने जोर धरला आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक दृष्टिनेही आता वसाहती टिकवून धरणे अवघड झाले, त्यामुळे नाईलाजास्तव

या वसाहतींना स्वातंत्र्य देणे त्यांना भाग पडू लागले म्हणूनच १९६५ पर्यन्त या खंडातील ३७ राष्ट्रे स्वतंत्र झाली. १९६५ च्या नंतरच्या या १५ वर्षातही जवळजवळ आणखी १२ राष्ट्र स्वतंत्र झाली. याच मालिकेतील ब्रिटिशांच्या वसाहतीतील शेवटचे ऱ्होडेशिया हे राष्ट्रही आता १८ एप्रील १९८० रोजी स्वतंत्र होऊन 'झिंब्बाबे' या नव्या नावाने नव्या उमेदीने उदयास आले. आहे या घटनेचे जगात सर्वत्र स्वागत झाले असून झिंब्बाबेचे प्रभावी मार्क्सवादी नेते रॉबर्ट मुगाबे यांच्या नेतृत्वाखालील लोक राज्याला ब्रिटनसहित सर्वच राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ही एक असाधारण घटना म्हणून इतिहासाला नोंद घ्यावी लागेल.

समृद्ध देशात जुलूमशाही :

झिंब्बाबेचे अर्थात पूर्वीचा ऱ्होडेशिया हा देश १८९६ पासून ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीत होता. सुपीक जमीन, सोने, कोळसा, लोखंड, तांबे, असबेटस, निकेल, क्रोमियम, युरेनियम यासारख्या अतिशय मौल्यवान संपत्तीचें आगर म्हणजे झिंब्बाबे यामुळे ब्रिटीशांनी या भूप्रदेशावर आपल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर स्वस्त दरात, मुबलक प्रमाणात अज्ञानी कृष्ण वर्णीयांना राबवून सर्व संपत्तीची प्रचंड प्रमाणावर लूट चालविली. केवळ २ लक्ष गोऱ्यांनी पन्नास लक्ष आफ्रिकन कृष्ण वर्गीयावर चालविलेली ही जुलूमशाही नष्ट करण्याचे प्रयत्न १९५० नंतर दिवसेंदिवस वाढू लागले. १९६१ साली याला अधिक वेग आला. जोशुवा एन्कगो यांच्या नेतृत्वाखाली झानू (झिंब्बबे अफ्रिकन पिपल्स युनियन) या लढाऊ संघटना स्वातंत्र्य संग्रामात उतरल्या. १९६१ पासून १९७८ पर्यंत सशस्त्र लढा होत राहिला स्वातंत्र्यवादी झाबू या लढाऊ सशस्त्र संघटनाचे २० हजारावर गनिमी नष्ट झाले, बेघर झाले. १९६१ मध्ये सवलत म्हणून एक टक्का आफ्रिकी लोकाना मतदानाचा हक्क देणारी घटना ब्रिटीश सरकारने देवू केली अर्थातच स्वातंत्र्य चळवळ च्या पुढाऱ्यांनी ती अमान्य केली. तेव्हा पंतप्रधान

व्हाईट हेड यांनी राष्ट्रीय पक्ष बेकायदेशीर ठरवला व पुढे स्वातंत्र्याची मागणी करण्यावरच बंदी घातली अमेरिकेने १९६५ अखेर ब्रिटीश वसाहतकरानी ऱ्होडेशियात अल्प संख्यांक गोऱ्यांची फँसिस्ट राजवट सुरू केली तिच्याविरूद्ध जगातील लोकमत आवाज उठवू लागले. तेव्हा गोऱ्यानी १९६२ च्या निवडणूकीत वर्णद्वषांचा अधिकच पुरस्कार करणारे ऱ्होडेशियन फ्रॅटचे ओआन स्मिथ सरकार अस्तित्वात आणले. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातील सर्व पुढाऱ्यांना तुरुंगात टाकले. हद्दपार केले. परंतु यामुळे चळवळ थांबली नाही दिवसेनदिवस जन जागृती वाढत जाऊन १९७८ मध्य लढ्याचे तीव्र स्वरूप धारण केले. तेव्हा ब्रिटिश सरकारने तात्पुरती तडजोड करून १९७८ च्या जून मध्ये बिशप मुझरेबा या आफ्रिकन नेत्याला पंतप्रधानपद देवून आपल्या हातचे बाहुले बनविले. हे सर्व राष्ट्रवादी, स्वातंत्र्यवादी जनतेला आणि मुगाबे तसेच एन्क्रेमी यांना मान्य नव्हते त्यांनी आपला लढा अधिक तीव्र केला.

लँकेस्टर हाऊसची गोलमेज परीषद

१९६५ पासूनच्या स्मिथच्या एकतर्फी ऱ्होडेशियाच्या घोषणा-पासून सतत १४ वष लढा देण्याचे फलीत म्हणून डिसेंबर १९७९ मध्य लंडनच्या व्हिक्टोरियाकालीन भव्य ब्लँकेस्टार हाऊसमध्ये ब्रिटिश विदेश सचिव लॉड कॅरिंग्टन यांच्या अध्यक्षतेखाली पधरा आठवड वार्तालाप परीषद ऱ्होडेशियाचे सर्वपक्षाच्या (गोलमेज परिषद) नेत्यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. एकंदर आठ बैठका घेण्यात येवून एप्रील ७९ मध्ये बिशप अबेल मुझरेवाचे सरकार बरखास्त करून नव्याने निवडणुका घेण्याचे ठरले. मधल्या काळात शासन चालविण्यासाठी एक गव्हर्नर नेमण्याचे ठरले. हाऊस ऑफ लार्डसचे टोरी सदस्य आणि भुतपूर्व ब्रिटीश पंतप्रधान चर्चिल याचे जावई लॉड सौम्य याची निदुक्तो करण्यात आली. निवडणुकीनंतर जनतेच्या कौलानुसार ऱ्होडेशियाला स्वातंत्र्य देवू असे लँकेस्टर हाऊसमधील सर्व पक्षीय बैठकीत ठरले. ब्रिटीशांना आणि आफ्रीके-तील अनेक राष्ट्रांना असे वाटत होते की, ब्रिटीश धार्जिणे बिशप

मुजरेवा याचेच सरकार निर्माण होईल कारण झानु याची पेस्ट्रो-एटोक फ्रंट ही केवळ सशस्त्र चळवळ आहे हिला बहुजन समाजाचा साथ नाही असे त्याना वाटत होते. टांझानियाचे अध्यक्ष न्यरेरे यांनी मात्र मुगाब अथवा एन्क्रोमो यांना सत्ता मिळाली नाही तर नव्या सरकारला आपली मान्यता मिळणार नाही असे म्हटलेले होते. तेव्हा ठरल्या प्रमाणे मोकळचा वातावरणात २७ फब्रुवारी ते ५ मार्च १९८० या काळात मतदान घेण्यात आले. दरम्यानच्या काळात रॉबर्ट मगाबे आणि एन्क्रोमा या कट्टर राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्यवादी नेत्याना ठार करण्याचे प्रय-न करण्यात आले. त्यांच्यावर वॉवफेक करण्याचेही अयशस्वी प्रयत्न झाले. एन्क्रोमो यांना पंतप्रधानपद देऊ करून फोडण्याचे प्रयत्न झाले. जनतेत अनेक अफवाहा पसरविण्यात ब्रिटीश समर्थकांनी (स्मिथ बिशप मुजरेवा) कमी केले नाहा. परंतु या सर्व फॉसिस्ट प्रकाराला या नेत्यानी दाद दिली नाही. ऑफ्रिकन जनतेला स्वराज्याचे स्वातत्र्याचे महत्व पटवून देण्याचे प्रयत्न त्यांनी चालविले. मगाबे यांनी निवडणूका प्रचारात अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावली. गोऱ्यांचा द्वेप न करता त्यांच्या स्वार्थी प्रवृत्तीवर टीका केली. यामुळे सर्व ऱ्होडशियन जनतेत नवे चैतन्य निर्माण झाले आणि निवडणूकीसाठी मतपेटीतून स्वराज्यासाठीची क्रांती घडवून आणली, स्वातत्र्य मिळवून दाखविले. एकूण १०० जागापैकी २० जागा गोऱ्या अल्पसंख्यांकासाठी राखीव होत्या त्या त्यांनी पूर्ण जिकल्या. त्यात नवल ते काय? उरलेल्या ८० जागापैकी मुगाबेना ५८ जागा, एन्क्रमोंना २८ जागा तर ब्रिटीशचे हस्तक असलेल्या मुझरेवा यांना केवळ चार जागा मिळाल्या इतक्या मागासलेल्या आणि मतदान करण्यासाठी नवीनच असलेल्या जनतेने ९३.३ टक्के मतदान केले हे यातील विशेष आहे. यावरून राष्ट्रवाद, स्वातंत्र्य आणि लोकशाही मुल्यांची जनतेची आस्थाच दिसून येते.

रॉबर्ट मुगाबे यांच्या प्रचंड विजयानंतर सर्वानाच आश्चर्य वाटले. पराभूत ब्रिटीशधार्जीने बिशप मूजरेवा यांनी निवडणूका

चांगल्या वातावरणात घडल्या नाहीत. मतदान केंद्रावर दहशतीचे वातावरण होते असे म्हटले. परंतु मुझरेबा यांच्या या वक्तव्याला काहीच अर्थ नाही. त्यांना अवघ्या चार जागा मिळाल्याने ते त्रासलेले होते. निवडणूक काळात जगातील सर्व पत्रकार, राजनितिज्ञ यांनी प्रत्यक्ष जावून पाहणी केलेली होती. विशेष म्हणजे राष्ट्रकूल संघटनेतर्फे भूतपूर्व भारतीय राजदूत श्री. राजेश्वर दयाल यांचे नेतृत्त्वाखाली ११ लोकांच एक निरिक्षक पथकही झिम्बाब्वेत या काळात होत. यामुळे जनमताचा कौल योग्य असल्याचा पुरावा सबळ आहे म्हणून मुझरेबांचे म्हणणे स्वार्थी वृत्तीचे आणि खोटे आहे असे म्हणावे लागेल.

स्वराज्य मिळाले, जबाबदारीही वाढली –

झिम्बाब्वेच्या यशस्वी स्वातंत्र्य संग्रामाने आता हे एक युद्ध संपले खरे पण एवढ्यावरच समाधान मानावयाच काय? आता त्याना स्वराज्यात नव निर्माणाच्या, सर्वांगिण विकासाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. त्यासाठी मुगाबे यांना अनक प्रश्न अतिशय कौशल्यपूर्वक दूरदृष्टि ठेऊन सोडवावी लगतील. अंतर्गत आणि बहिर्गत विरोधाला सामोरे जावे लागणार आहे. राष्ट्राच्या पुनरंचनेच्या त्याच्या कल्पनांना मूर्त स्वरुप आणण्यासाठी कोणतीही घाई करुन जमणार नाही. सर्वाचे सहकार्य घेणे आवश्यक आहे कल्याणकारी राज्याच्या निर्मितसाठी गोऱ्या अल्पसंख्याकाला बरोबर घेऊन गेले पाहिजे.

रॉबर्ट मुगाबेंचे समतोल, प्रभावी नेतृत्व :

विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, निवडणूकीत विजयी झाल्यापासून ते आता मुगाबे पंतप्रधान, झाल्यानंतर त्यांनी जी अतिशय सौजन्यपूर्ण समंजस उदात्तमतवादी भूमिका घेतलेली आहे ती खरोखरच प्रशंसनीय आहे. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या मुलाखती आणि भाषणातून आपल्या शासनाने धारण कसे राहील हे स्पष्ट केलेले आहे. अंतर्गत कारभार लोकशाही व परराष्ट्र धोरण

अलिप्ततेचे राहील. झिम्बाबे राष्ट्रकुलाचा सदस्यही होईल असेच त्यांनी सांगितले. गनिमांचे राष्ट्राच्या सैन्यात रुपांतर होईल. ब्रिटिश अधिकाऱ्यानी आणखी काही काळ येथेच राहावे, ब्रिटिशाच्या व्यापार उद्योगावर जाचक बंधने राहणार नाहीत, त्यांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे. अल्पसंख्याक गोऱ्यांना काहीच त्रास होणार नाही त्यांनी कृष्णवर्णी यांचे अंकित म्हणून सुखाने. जगावे त्यांना सुरक्षितता देण्यात येईल. त्याच्यावर अमानुष बंधने राहणार नाहीत. दक्षिण आफ्रिकेशी आणि इतर सर्व राष्ट्राशी शांततामय सहजीवनाचे संबंध राहतील असे धोरण स्पष्ट केले. स्वातंत्र्य संग्रामातील एन्क्रोमो यांना गृहमंत्री म्हणून घेण्यात आले तर आपल्या २३ सदस्यांच्या मंत्री मंडळात दोन गोऱ्या आणि एन्क्रामीच्या गटातील चार सदस्याचा समावेश केला. यावरून त्यांची सर्व समावेशक वृत्ती आणि समजूतदार-पणा दिसून येतो.


पहिला स्वातंत्र्य सोहळा :

१८ एप्रिल १९८० रोजी पहिल्या स्वातंत्र्य सोहळ्यात जगातील जवळपास १०० राष्ट्रांच्या प्रमुखांनी हजेरी लावली आणि या नव्या राष्ट्रास शुभेच्छा व्यक्त करून सहकार्याचा हात पुढे केला. या अपूर्व सोहळ्यात भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि परराष्ट्र मंत्री श्री नरसिंहराव उपस्थित होते. भारत हा राष्ट्रकुलातील अलिप्त राष्ट्राच्या चळवळीतील आणि तिसऱ्या जगा-तील प्रमुख देश असल्यामुळे झिम्बाबेला भारताकडून मोठ्या अपेक्षा असणार आणि त्या दृष्टीने भारतानेही झिम्बाबेच्या स्वातंत्र्यप्रेमी, लोकशाहीवर श्रद्धा ठेवणाऱ्या जनतेला पूर्ण पाठिंबा आणि सहकार्य देण्याचे आनंदाने मान्य केले. झिम्बाबे आणि आपल्या देशात बरेच साम्य असल्याचे जाणवते. नव्हे तर मुगाबे यानी स्व. पंडित जवा-हरलाल नेहरुच्या धोरणाचा सखोल अभ्यास केलेला असावा आणि त्याप्रमाणेच ते आपली वाटचाल करत आहेत असे वाटते. कारण

मुगाबेच्या आतापर्यंतच्या अल्पशाच वाटचालीतून त्यांचे स्पष्ट दृश्य दिसून येत आहे. एका दृष्टीने ही महत्वाची आणि चांगली घटना म्हटली पाहिजे, एकंदरीत मुगाबेचे समतोल प्रभावी आणि दुरदृष्टे नेतृत्व झिंब्बाबेला मिळाल्यामुळे हा देश एका नव्या जोमाने प्रगती पथावर राहील असा विश्वास वाटतो.

तेव्हा झिंब्बाबेला तर आता स्वतंत्र झाला. ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीचा हा शेवटचा बुरूज ढासळला हे खरे. याचा कोणाही मानवतावादी व्यक्तिला आनंद होईल पण झिंब्बाबेची या पुढील वाटचाल लोकशाही समाजवादाच्या दिशेने व्हावी. त्यावर कोणाही स्वार्थी स्मिथ अथवा बिशप मुजरेबा सारख्या साम्राज्यवादीच्या फँसिस्ट प्रवृत्तीच्या हस्तकांची नजर पडू नये. रॉबर्ट मुगाबे आणि एन्क्रोमी यांच्या ध्येयवादी कर्तव्याची, त्यागाची आठवण झिंब्बाबेशियन ठेवतील आणि त्यांना कल्याणकारी लोकराज्य बनविणेच सहकार्य देतील अशी आशा करू या. झिंब्बाबेच्या निमित्ताने पुन्हा एकदा तिसऱ्या जगाला जागे केले आणि स्वातंत्र्य सग्रामाची तसेच नवनिर्माणची आठवण करून दिली एवढे मात्र खरे.

या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाची एकूण लोकसंख्या ४ कोटी ७ लाख इतकी असून एकूण क्षेत्रफळ ३,६१,१०४ कि. मि. इतके आहे येथील प्रमुख राजकिय पक्ष झिंब्बाब्बे आफ्रिकन नॅशनल युनियन पेट्रीऑटीक फ्रंन्ट हा आहे. याचे नेते अर्थातच रॉबर्ट मुगाबे आहेत. इतर पक्षात पेट्रीऑटीक फ्रन्ट, युनायटेड ऑफ्रिकन कॉन्सील, झिंब्बाबे डेमॉक्राटीक पार्टी, युनायटेड नॅशनल फेडरल पार्टी, युनायटेड पिपल्स असोशिएशन ऑफ मेन्टीबली लॅण्ड आदी पक्ष आहेत १९८० आणि १९८५ मध्ये या देशात सार्वत्रिक निवडणूका झाल्या. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.



अनु	राजकीय पक्ष	मतदान १९८०	मतदान १९८५	राज्य १९८०	राज्य १९८५
१	झेड ए एन.यू (झानु)	१६.८८ ९९२	२१,९९,०५७	५७	६४
२	झेड ए.पी.यू (झापू)	६,३८,८७९	५,१७,१५४	२०	१५
३	यू ए.एन.सी. (यून्सी)	२.१९,३०७	६५,६०३	३	०
४	झेड ए.एन यू (सिथलगट)	५३,३४३	३५,७३७	०	१
५	एन डि यू.	१५,०५६	२९५	०	०
६	एन.एफ झेड.	१८,१८१	८१	०	०
७	झिंबाबे डेमॉक्राटीक पार्टी	१८,७९४	-	०	०
८	युनायटेड नॅशनल फेडरल पार्टी	५,७९७	०	०	०
९	युनायटेड पिपल्स असोसिएशन ऑफ मेटीवली लँड	१,१८१	–	०	०

'झानु' हा रॉबर्ट मुगाबे यांच्या नेतृत्वाखाली आज झिंबाबे हे नवोदित विकसनसिल राष्ट्र तिसऱ्या जगातील आणि अलिप्तता चळवळीतील महत्वाची भूमिकत पार पाडत आहे.

आठवी अलिप्त राष्ट्रांची परिषद:

१९८६ च्या ऑक्टोबरमध्ये अलिप्त राष्ट्राची आठवी परिषद आता झिंब्बाबे मध्ये 'हरारे' या राजधानी शहरा होणार आहे. भारतानंतर आता या चळवळीचे नेतृत्व झिंबांबेंच्या मुगाबे यांच्याकडे जाणार आहे. त्यामुळे त्यांना फार मोठी जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. स्वतःच्या देशाच्या समस्या तर आहेतच पण जागतीक राजकारणातही या देशाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे. तेव्हा अफ्रिकेतील नव्याने स्वतंत्र

झालेल्या या देशाचा हा थोडक्यात आढावा आहे. या निमित्ताने अफ्रिकेतील सर्व देशाची तोंडओळख, प्राथमिक माहिती तालीका सोबत देत आहे यावरून आफ्रिका खंडाचा परिचय वाचकांना होईल अशी आशा आहे.

अनु.	देशाचे नाव	राजधानी	क्षेत्रफळ कि मी. मध्ये	लोकसंख्या
१	डेमॉक्राटीक अँड पॉपीलर रिपब्लिक ऑफ अजेरिया	इलडझेर (अलजियर्स)	२३,८१,७४१	१८.०९ दशलक्ष
२	पिपल्स रिपब्लीक ऑफ, अंगोला	लुण्डा	१२,४६,८००	७.०० दशलक्ष
३	रिपब्लीक ऑफ बोस्टवाना	गबोरोना	३,८२,०००	४५००००
४	रिपब्लिक ऑफ बुरुण्डी	बुजुम्बुरा	२७,८३४	४.०१ दशलक्ष
५	युनायटेड रिपब्लीक ऑफ कामेरुन	युअण्डे	४,७८,०००	८.०५ दशलक्ष
६	सेंट्रल आफ्रीकन रिपब्लीक	बँन्गुअर्ड	३,२२,९८४	२.०५
७	रिपब्लीक ऑफ चाड	न्डीज-मेना	१२,८४,०००	४.४२ दशलक्ष
८	फेडरल इस्लामिक रिपब्लीक ऑफ कोमोरोस	मोरोनी	२.१७१	३,००,०००
९	पिपल्स रिपब्लीक ऑफ बेनीन	पोटॉनोव्हा	१,१२,६२२	३.५५ दशलक्ष
१०	पिपल्स रिपब्लीक ऑफ कांगो	ब्राझाविली	३४,२००	१.५५ दशलक्ष
११	रिपब्लिक ऑफ डीजीबौटी	डीजीबौटी	२३,०००	३,५५,०००
१२	अरब रिपब्लीक ऑफ इजिप्त	कैरो	१०,२०००	४२ दशलक्ष
१३	रिपब्लोक ऑफ एक्वेटोनोयल मालाब गुनिया		२८,०५१	३५००००

अनु.	देशाचे नाव	राजधानी	क्षेत्रफळ कि. मी. मध्ये	लोकसंख्या
१४	सोशीयालिस्ट इथोपिया	अँडीस-अबाब	१२.३७,०००	३१ दशलक्ष
१५	गबोनीस रिपब्लीक	लीब्रेव्हीली	२,६७,६६७	६६००००
१६	रिपब्लीक ऑफ गांबिया	बन्जुल	११,२९५	५९५०००
१७	रिपब्लीक ऑफ गहाना	अॅक्रा	२,३९,५३८	११.३५ दशलक्ष
१८	पॉपीलर अँड रिव्हयुक्युशनरी रिपब्लीक गुन्यीया	कोनाक्री	२,४५,९५७	३.०५ दशलक्ष
१९	रिपब्लीक ऑफ गुनिया ब्रीसाऊ	ब्रीसाऊ	३६,१२५	७८००००
२०	रिफब्लीक ऑफ आयव्हरी कॉस्टे	अबीडजन्	३,२२,४६३	८.२५ दशलक्ष
२१	रिपब्लीक ऑफ केनिया	नैरोबी	५,८२,६४६	१५.३२ दशलक्ष
२२	किंगडम ऑफ लेसोथो	भासेरू	३०,३५५	१.०३ दशलक्ष
२३	रिपब्लीक ऑफ लीबेरिया	मोन्रोव्हीया	१,११,३६९	१.०९ दशलक्ष
२४	सोशीयालिस्ट पिपल्स लिबीयन अरब-जामहिरीया	ट्रीपोली	१७,५९,१४०	३.०० दशलक्ष
२५	लोकशाही लोकसत्ताक माडागास्कार	अन्टान्नारिओ	५,८७,०४१	८.०७ दशलक्ष

अनु.	देशाचे नाव	राजधानी	क्षेत्रफळ कि मी. मध्ये	लोकसंख्या
२६	रिपब्लीक ऑफ मालवी	लीलोन्वे	११,८४८४	५ ५६ दशलक्ष
२७	रिपब्लीक ऑफ माली	बामको	१२,४०,०००	६.९५ दशलक्ष
२८	इस्लामिक रिपब्लीक ऑफ मौरिटानिया	नौवाक्-चीट	१०,३०,७००	१.६४ दशलक्ष
२९	मौरिटीयस्त	पोर्टलुईस		९,७०,०००
३०	किंगडम ऑफ मोरोक्को वेस्टर्न सहारा	रब्बत	४,४६,५५०	२०.६'१ दशलक्ष
३१	पिपल्स रिपब्लिक ऑफ मोझुम्ब्बेन	मापुतो	७,८३,०१०	१२.१३ दशलक्ष
३२	नामिब्रिया	वीन्ढोक	८,२३,६२०	१ दशलक्ष
३३	रिपब्लीक ऑफ नीगेर	नीमे	१२,६७,०००	५.३ दशलक्ष
३४	फेडरल रिपब्लिक ऑफ नायजेरिया	लागोस	९,२३,७६८	१०० दशलक्ष
३५	रवन्डीस रिपब्लीक	मलाबो	२६,३३८	३,१०,०००
३६	डेमोक्रॉटीक रिपब्लिक ऑफ साव-टीम ॲण्ड पीन्सपी	साव-टोस	९६४	१,१०,०००
३७	रिपब्लीक ऑफ सेनेगग	डाकान	१,९६,१९२	५.७
३८	रिपब्लीक ऑफ सिचेलीस	व्हीक्टोरिया	४०४	६६,०००
३९	रिपब्लीक ऑफ सिरॅलीओन	फ्रीटाऊन		३.४ दशलक्ष
४०	डेमॉक्राटीक रिपब्लीक सोमाली	मोगाडिशू	६,२६,५४१	३.९ दशलक्ष

अनु.	देशाचे नाव	राजधानी	क्षेत्रफळ कि. मी. मध्ये	लोकसंख्या
४१	रिपब्लीक ऑफ साऊथ आफ्रीका	केपटाऊन	१२,२१.०३७	२५.४ दशलक्ष
४२	डेमॉक्रटीक रिपब्लीक ऑफ सुदान	खारहाऊम	२५ ०५,८१३	२० दशलक्ष
४३	किंगडम ऑफ स्वाझीलँड	मबाबने	१७,३६४	५,५५,०००
४४	युनायटेड रिपब्लीक ऑफ टांझानिया	डक्सी-सलान	९,४५,०००	१९ दशलक्ष
४५	रिपब्लीक ऑफ टोगी	लोमे	५६,०००	२.५ दशलक्ष
४६	रिपब्लीक ऑफ द जुनिसिया	टुयीस	१,६३.६१०	६.९ दशलक्ष
४७	रिपब्लीक ऑफ युगांडा	कंपाला	२,३६,०३६	१४ दशलक्ष
४८	रिपब्लीक ऑफ अप्पर व्होल्टा	औगा-डौगुआ	२,७४.२००	६.७ दशलक्ष
४९	रिपब्लीक ऑफ झैरे	कीनशासा	२३.४५,४०९	२८ दशलक्ष
५०	रिपब्लीक ऑफ झांबिया	लुसाका	७,५२,६१४	५.८ दशलक्ष
५१	रिपब्लीक ऑफ झिबांबे	हरारे	३,९१.१०९	७.४ दशलक्ष

REFBK-0025133



प्रा. अशोक नाईकवाडे हे घडणाऱ्या घडामोडीचे आणि त्यातुन प्रस्तुत होणाऱ्या प्रश्नांचे एक डोळस अभ्यासक आहेत 'प्रतिक्रिया' या सार्थ नावाने प्रसिद्ध होणारा त्यांचा हा लेख संग्रह त्यांच्या अभ्यासाचा एक भाग आहे राज्यशास्त्राचे अभ्यासक व पत्रकार म्हणून ते मराठवाड्यातील वाचकांना परिचित आहेत. विविध नियतकालीकातून व वृत्तपत्रातून त्यांनी प्रासंगीक, वैचारिक स्वरूपाचे लिखाण केलेले आहे. विद्यार्थीदशेपासूनच त्यांनी स्वत:ला लिहण्याची व बोलण्याची सवय लावून घेतली आहे. प्रतिकुल परिस्थितीशी टक्कर देत देत त्यांनी स्वत:चे शिक्षण पूर्ण केले. चेहऱ्यावरचे हास्य मालवू न देता आणि मनातला आशावाद न ढळू देता प्रतिकुल परिस्थितीवर या तरुणाने मात केली आहे. अशोक नाईकवाडे यांना जे खडतर आयुष्य जगावे लागले आहे. त्याने त्यांना दोन अतिशय महत्वाच्या गोष्टी दिल्या आहेत, त्या म्हणजे विनम्रता आणि चिंतनशीलता.

विविध प्रश्नांच्या व घडामोडींच्या संदर्भात विवेचक दृष्टीने व्यक्त केलेल्या त्यांच्या 'प्रतिक्रिया' या लेखसंग्रहामध्ये आढळतात. हे सर्व लेख प्रासंगीक स्वरुपाचे असले तरी त्यामागे नाईकवाड्यांचे चिंतन आहे. आणि त्या चिंतनामागे त्यांची स्वत:ची एक वैचारिक बैठक आहे.

त्यांनी व्यक्त केलेले विचार हे सामाजिक जाणिवा उराशी बाळगून जगणाऱ्या समकालीन तरुणांचेही प्रतिनिधीक विचार आहेत असे म्हणणे अप्रस्तुत ठरणार नाही.

— प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे